# संपादकीय

## इंग्लंडमधील ग्रंथव्यवहाराचे बदलते स्वरूप

इंटरनेट - संगणक - दूरचित्रवाणी - केबल टी.व्ही. - वृत्तपत्रे व अन्य संज्ञापन माध्यमे यांच्या गदारोळात जागतिक ग्रंथव्यवहार हा घसरणीला लागणार, मुद्रित शब्दाचे महत्त्व कमी कमी होत जाणार असे काहीजण भविष्य वर्तवत असले तरी एकूण ग्रंथक्षेत्रातील उलाढाल वाढतच आहे. ग्रंथव्यवहाराचा व्याप हा केवळ छापील ग्रंथांपुरताच सीमित राहिलेला नाही. तर ध्वनिफिती, ध्वनिचित्रफिती (ऑडिओ - व्हिडिओ कॅसेट्स्), कॉम्पॅक्ट डिस्क-रॉम (सी. डी. रॉम), ई-बुक्स, मिल्टिमिडिया यांचाही त्यात समावेश होऊ लागला आहे. अमेरिका-इंग्लंडमध्ये मोठ्या प्रकाशनसंस्था आता वृत्तपत्रे, मासिके, बुक क्लब्ज, चित्रपटनिर्मिती, रेडिओ व दूरचित्रवाणी केंद्रे, सीडी रॉम निर्मिती, ई बुक्स यासाख्या प्रकल्पांमध्येही मोठी गुंतवणूक करीत आहेत. प्रकाशन संस्थेची पारंपरिक संकल्पनाच आता बदलत आहे. त्याचबरोबर ग्रंथप्रकाशनाचे क्षेत्र हे केवळ विशिष्ट भाषेपुरते वा राज्यापुरते मर्यादित राहिलेले नसून त्याला जागतिक व आंतरराष्ट्रीय रूप येत आहे. मोठ्या प्रकाशनसंस्था जगभर आपल्या शाखा उघडत असून, वेगवेगळ्या भाषांमध्ये आपली पुस्तके काढण्याच्या योजना राबवत आहेत. आणि आपली प्रकाशने जगभर उपलब्ध असावीत या दृष्टीने स्थानिक वितरकांशी संपर्क साधत आहेत. ग्रंथप्रकाशन ही बाब आता माहिती तंत्रज्ञानाशी आणि रंजनक्षेत्राशी निगडित झाली असून जगातील प्रत्येक लहानमोठ्या व्यक्तीकडे ग्राहक म्हणून पाहण्याची क्षमता या व्यवसायाला आता प्राप्त झाली आहे. केवळ पुस्तके वाचणारा वा विकत घेणारा तोच तेवढा आपला ग्राहक हा संकुचित समज आता कालबाह्य ठरला आहे. वॉल्ट डिस्नेची कंपनी केवळ लोकप्रिय परीकथांच्या चित्रकथांची, कार्टून्सची वा कॉमिक्सची पुस्तके काढूनच थांबत नाही, तर त्या चित्रकथांवर आधारित चित्रपट, व्हिडिओ कॅसेटस्, व्हिडिओ गेम्स, सी डी रॉम्स यांचीही निर्मिती करते. एवढेच नव्हे तर त्यावर आधारित खेळणी, टी शर्ट, मुलांचे कपडे, भेटवस्तू, वह्या, वगैरेंची ही निर्मिती करून आपली उलाढाल प्रचंड वाढवते. तात्पर्य हे की आता या पुढच्या काळात पुस्तक व प्रकाशक याबद्दलच्या आपल्या रूढ कल्पनांना कवटाळून राहून चालणार नाही. वाचक या संकल्पनेचाही फेरविचार करावा लागेल. 'ग्राहक' म्हणून त्याच्याकडे बघून त्याला आकृष्ट करण्याचे मार्ग धुंडाळावे लागतील, त्यासाठी आपला माल हा केवळ मुद्रित पुस्तकाच्या रूपापुरताच मर्यादित न ठेवता, वेगवेगळ्या रूपात देण्याची तयारी करावी लागेल. या संपूर्ण व्यवसायाचा व्याप हा आंतरराष्ट्रीय संदर्भातच यापुढे आपल्या डोळ्यापुढे असायला हवा. त्यादृष्टीने या क्षेत्रातील स्पर्धाही तीव्र होत जाणार.

मोठमोठ्या अमेरिकन व ब्रिटिश प्रकाशन संस्थांमध्ये एकत्रीकरणाची लाटही सध्या जोरात आहे.

इंग्लंडमधील पेंग्विन आणि हॉडर हेडलाइन या दोन मोठ्या प्रकाशन संस्था अजूनही ब्रिटिश मालकीच्या आहेत. परंतु ट्रान्सवर्ल्ड आणि रँडम हाऊस या दोन्ही प्रकाशनसंस्था बर्टेल्समानने विकत घेतल्या आहेत तर हार्पर कॉलिन्सवर रूपर्ट मर्डोकच्या न्यूज इंटरनॅशनल ग्रुपचा अंकुश आहे. जर्मनीच्या होल्ट्झब्रिंकने मॅकमिलनवर ताबा मिळवला आहे, डच एल्सेविअर कंपनीने 'रीड' ही प्रकाशन संस्था विकत घेतली आहे तर ओरियन प्रकाशन संस्था फ्रेंच हॅचेट कंपनीच्या ताब्यात आहे. इंग्लंडमध्ये या प्रकाशन संस्थांतर्फे कोणती पुस्तके प्रसिद्ध व्हावी याचा निर्णय साहजिक केवळ ब्रिटिश वाचक समोर ठेवून आता होत नाही. अन्य देशांतील व्यावसायिक व्यक्ती त्याबाबत निर्णय घेतात. १९८० नंतर प्रकाशन संस्थांची मालकी मिळविण्याच्या दिशेने बरेच लोक पुढे सरसावले आणि केवळ वैयक्तिक मालकीचे व स्वान्त:सुखाय प्रकाशन करण्याचे दिवस संपुष्टात आले. एक जागतिक पातळीवरच्या व्यवसाय म्हणून ग्रंथप्रकाशनाचे पर्व सुरू झाले. १९८० पासून प्रकाशनक्षेत्रात व्यावसायिक देवाणघेवाणीला वेग आला. जोनाथन केप, चॅटो अँड विन्डस आणि अॅसोसिएटेड प्रेस या तीन कंपन्या अमेरिकन प्रकाशकांनी विकत घेतल्या. तसेच मोठ्या प्रकाशनसंस्था छोट्या प्रकाशकांना आपल्यात सामावून घेत राहिल्या आणि स्पर्धेत प्रभावी ठरू लागल्या. इंग्लंडमधील पहिल्या दोन मोठ्या कंपन्यांत आज प्रकाशनक्षेत्रातील एकूण ६२टक्के कर्मचारी कार्यरत आहेत.

हाऊ टू मार्केट बुक्स या पुस्तकात ब्रिटिश प्रकाशन व्यवसायासंबंधी अॅलिसन बॅव्हरस्टॉक या लेखिकेने अशी बरीच उपयुक्त माहिती दिली आहे. ती मराठी ग्रंथव्यवहाराशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींना उपयुक्त वाटेल.

**बुक ट्रस्ट**

१९२० मध्ये नॅशनल बुक लीग ही संस्था स्थापन झाली. सर्व वयाच्या व संस्कृतीच्या वाचकांमध्ये पुस्तके आणि वाचनप्रवृत्ती यांचा प्रसार प्रचार करण्याचे या संस्थेचे उद्दिष्ट होते. परंतु नव्या तंत्रज्ञानामुळे व मनोरंजन क्षेत्रातील नवनव्या पर्यायांमुळे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या संस्थेने बुक ट्रस्ट असे नाव धारण करून आपले कार्यक्षेत्र अधिक व्यापक केले. बुक ट्रस्ट द्वारे पुस्तकांबद्दलच्या माहितीचे संकलन व वितरण केले जाते. कॉमनवेल्थ लेखकाच्या कादंबरीला देण्यात येणाऱ्या बुकर प्राइझची व इतर आठ पुरस्कारांची व्यवस्था पाहते. वाचनाशी संबंधित बाबींवर संशोधनाला चालना देते आणि प्रकाशन व्यवसायात एक दबाव गट म्हणूनही काम करते.

या बुक ट्रस्टच्याच जोडीने यंग बुक ट्रस्टही कार्यरत आहे. सरकार, शिक्षणक्षेत्र, पालकवर्ग आणि बालकुमार यांच्या मनावर पुस्तकांचे महत्त्व ठसवण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम यंग बुक ट्रस्टतर्फे चालविण्यात येतात. गेली २५ वर्षे नॅशनल चिल्ड्रेन्स बुक वीक हा उपक्रम याच ट्रस्टच्या पुढाकाराने साजरा होत आला आहे. संदर्भ ग्रंथालय, बालसाहित्याची सूची आणि बालसाहित्य विषयक सर्व प्रकारच्या माहितीचे केंद्र हे उपक्रमही चालविण्यात येतात. (बुक ट्रस्ट, बुक हाऊस, ४५ ईस्ट हिल, लंडन SW 182 QZ. http:// dspace.dial.pipex.com/book trust)

**जे व्हिटॅकर**

लंडनमधील व्हिटॅकर या संस्थेतर्फे बुकसेलर हे साप्ताहिक चालविण्यात येते. त्याचबरोबर ग्रेट ब्रिटनमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व पुस्तकांची सर्वसमावेशक सूची तयार करण्याचे कामही या संस्थेच्या संपादक मंडळातर्फे होते. त्या त्या महिन्यातील पुस्तकांची यादी असणारी सीडी रॉम ग्राहकांना मिळू शकते. आठवड्यातील 'नवीन व आगामी पुस्तके' अशी सूचीही प्रसिद्ध करण्याचे काम ही संस्था करते. आठवड्यातील पुस्तकांची यादी बुकसेलरच्या शेवटच्या भागामध्ये देण्यात येते. मासिक व वार्षिक यादीही सीडी रॉमच्या रूपात मिळू शकते. 'व्हिटॅकर बुक ट्रॅक' मध्ये ग्रंथव्यवहाराशी संबंधित मार्केट रिसर्चचा मागोवा घेण्यात येतो. (जे व्हिटॅकर अँड सन्स लिमिटेड 12 Dyott street,London. W C I A 2 D F. WWW. thebookseller.com.)

पस्तीस वर्षे वयाच्या आतील प्रकाशकांची 'दि सोसायटी ऑफ यंग पब्लिशर्स' ही संस्था जे व्हिटॅकर या कंपनीच्याच पुढाकाराने निघालेली आहे. तिच्यात मुद्रक, ग्रंथपाल, ग्रंथविक्रेते व ग्रंथव्यवहाराशी संबंधित व्यक्तींना सदस्यत्व मिळू शकते. इम्प्रिन्ट नावाचे मासिकही काढण्यात येते. वार्षिक अधिवेशनात वेगवेगळ्या विषयांवर चर्चासत्रे होतात, तसेच देशपरदेशात अभ्यासदौरेही आखण्यात येतात.

प्रकाशन क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचीही 'वुमेन इन पब्लिशिंग' ही संस्था जे. व्हिटॅकरच्याच विद्यमाने कार्यरत आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी सायंकाळी महिलांची बैठक होते. मार्गदर्शक प्रशिक्षण केंद्रेही चालवण्यात येतात.

**ब्रिटिश कौंसिल**

ब्रिटिश कॉसिलच्या अनेक उद्दिष्टांपैकी ब्रिटिश पुस्तकांचा इतर देशात प्रसार करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. दरवर्षी शंभरावर प्रदर्शन भरवून वा ग्रंथजत्रांमध्ये भाग घेऊन नव्या ब्रिटिश पुस्तकांची माहिती वाचकग्राहकांना पुरवण्यात येते. ब्रिटिश प्रकाशकांची पुस्तके परदेशी ग्रंथप्रदर्शनांमध्ये मांडण्यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. जगभर या कौंसिलची दोनशे कार्यालये आहेत, आणि त्यांच्या द्वारे कुठल्याही ब्रिटिश प्रकाशकाशी व त्यांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधता येतो. पुस्तकांच्या भाषांतराचे व अन्य प्रकारचे हक्क मिळवण्याबाबत मार्गदर्शन करते. ब्रिटिश बुक मार्केट, ग्रंथदालने, ब्रिटिश वाचकाच्या आवडीनिवडी, ब्रिटिश प्रकाशकांच्या दृष्टीने महत्त्वाचे ग्रंथविषय इत्यादी माहितीही ब्रिटिश कौंसिलच्या माध्यमातून सहजगत्या मिळू शकते.

ब्रिटिश प्रकाशकांना परदेशातील ग्रंथप्रदर्शनात वा प्रकाशनक्षेत्रविषयक चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी ब्रिटिश ट्रेड इंटरनॅशनलच्या एक्सपोर्ट सर्व्हिसेस डायरेक्टोरेट आर्थिक मदतीचा हात पुढे करते. वेगवेगळ्या देशांसाठी स्वतंत्र विभाग आहेत.

बुक मार्केटिंग लिमिटेड ही संस्था १९९० पासून ग्रंथव्यवहार-विषयक माहिती देण्यासाठी 'बुक्स अँड द कंझ्युमर' हे नियतकालिक प्रसिद्ध करते. 'बुक फॅक्टस्' हे वार्षिक प्रकाशनही या संस्थेतर्फे निघते. त्यात ग्रंथ प्रकाशन क्षेत्रातील विविध घटनांची व नव्या प्रवाहांची साक्षेपी नोंद घेण्यात येते. (बुक मार्केटिंग लिमिटेड, ७ ए बेडफोर्ड स्क्वेअर, लंडन WC 1 B 3RA. bml.@ bookmarketing.co.uk)

लंडनमधील दि पब्लिशिंग ट्रेनिंग सेंटर ॲट बुक हाऊस तर्फे प्रकाशन व्यवसायविषयक वेगवेगळे अभ्यासक्रम चालविण्यात येतात.

बुक्स फॉर कीप्स, कराउझेल (बालसाहित्यविषय मार्गदर्शक), बुक्स इन दि मिडिया, बुक्स मॅगेझिन, दि बुक सेलर, ग्रोसर मॅगेझिन, पब्लिशिंग न्यूज, दि स्कूल लायब्ररीयन, सिग्नल (बालसाहित्य विषयक सखोल संशोधन करणारे नियतकालिके) ही मासिके ग्रंथव्यवहाराच्या विविध अंगांचा मागोवा घेत असतात. नॅशनल सेंटर फॉर रिसर्च इन चिल्ड्रेन्स लिटरेचर या संस्थेतर्फे बालसाहित्याचे वितरण करण्याबाबत मार्गदर्शन मिळू शकते. (NCRCL @ roehampton.ac.uk)

मराठी प्रकाशनक्षेत्रातही असे प्रयत्न करण्याची गरज आहे.

**संपादक**





खास नोंद

# जागतिक प्रकाशनविश्व काही वैशिष्ट्ये

* ११९७ मध्ये ब्रिटिश प्रकाशकांनी ८४.४ कोटी पौंडांची पुस्तके निर्यात केली. त्याशिवाय ग्रंथविक्रेत्यांनी निर्यात केलेली पुस्तके वेगळीच !

* अमेरिकेची ९५ टक्के पुस्तकांची विक्री देशांतर्गत तर फक्त पाच टक्के परदेशात होते.

* जगातील सर्वात मोठी ग्रंथजत्रा फ्रँकफुर्टमध्ये दरवर्षी हिवाळ्यात होते. तेथे मुख्यत: प्रकाशक आपली नवीजुनी पुस्तके प्रदर्शित करून इतरांना त्यांचे पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे हक्क विकतात.

* सर्वात मोठी बालसाहित्य जत्रा बोलोग्ना बुक फेअर मार्चमध्ये भरते.

* अमेरिकेतील बुक एक्स्पो शिकागो व लॉस एंजेलिस येथे आलटून पालटून भरते. तिच्यात जगातील नामवंत प्रकाशक आवर्जून स्टॉल्स घेतात.

* लंडन बुक फेअरची व्याप्ती दरवर्षी वाढत असून जगभरचे ग्रंथप्रेमी या ग्रंथजत्रेला भेट देतात.

* सोशॅलिस्ट बुक फेअर ही कॅमडेन टाऊन हॉलमध्ये भरते. समाजवादी विचारधारेशी संबंधित पुस्तकांचे प्रदर्शन तेथे होते.

* विज्ञान कथालेखकांच्या परिषदाही दरवर्षी होतात. तेथे विज्ञानकथाविषयक पुस्तकांची जत्रा भरवली जाते.

* ग्रंथव्यवसायाशी संबंधित जर्नल्स - बुक मार्केटिंग लिमिटेड (बी एम एल), बुक ट्रॅक, बुक डाटा, बुक वॉच, पी ए अँड बी ए. बुकसेल्स, पब्लिशर्स न्यूज.

* १९९८ मध्ये एकूण १ लाख ४ हजार सहाशे चौतीस पुस्तके प्रकाशित झाली (व्हिटॅकरच्या संदर्भाप्रमाणे)

* कुठल्याही क्षणी ८ लाख पुस्तके ही बाजारात असतात. दरवर्षी त्यात सुमारे ६५ हजाराची भर पडते.

* ग्रंथांच्या दुकानातून सुमारे पन्नास टक्के पुस्तकांची विक्री होते, तर इतर माध्यमांतून उर्वरित विक्री होते.

* तीन प्रमुख साखळी ग्रंथ विक्रेते - एच एमी वी (डिलन्स अँड वॉटर स्टोन्स सह.) डब्ल्यू एच स्मिथ आणि बॉर्डर्स युके.

* १९९८ मध्ये पाच प्रमुख प्रकाशन संस्थांचा प्रौढ कथाकादंबऱ्यांच्या विक्रीतील वाटा ६५ टक्के होता, आणि दहा बालसाहित्य प्रकाशकांचा ८० टक्के वाटा होता.

* ब्रिटनमधील १११ विद्यापीठे आणि ६० महाविद्यालये यांमध्ये ॲकॅडमिक पुस्तकांचे प्रकाशन आणि वितरण होते. नामवंत प्रकाशन संस्थांचे त्याबाबत सहकार्य घेतले जाते. काही ठिकाणी दोघांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशन होते.

* बेस्ट्रॅम्सच्या यादीत १००० प्रकाशकांची १ लाख ६० हजार पुस्तके आहेत. बहुसंख्य पुस्तक विक्रेते वेगेवेगळ्या प्रकाशकांची पुस्तके स्वतंत्रपणे मागवण्यापेक्षा ठोक विक्रेत्याकडून घेतात. त्यामुळे वेळ व खर्च यांची बचत होते. मोठे ठोक विक्रेते २४ तासात मागविलेली पुस्तके पोचवतात. ठोक विक्रेते हे विस्तारित पुरवठा केंद्राप्रमाणे काम करून पुस्तक विक्रेत्याची साठवणुकीची जागा व गुंतवणूक यांचीही बचत करतात.

* ठोक विक्रेते हजारो प्रती एकदम घेतात, कोणते पुस्तक जास्त खपेल, वा कमी खपेल याबाबत त्यांचे काही आडाखे असतात. प्रकाशकांना ते आडाखे लक्षात घेऊन काम करावे लागते.

* डब्ल्यू. एच. स्मिथ या विक्रेत्याच्या खालोखाल पुस्तकांची विक्री बुक क्लबद्वारे होते. एकूण ग्रंथव्यवहारामध्ये १२ टक्के विक्री ही बुक क्लब द्वारे होते. पाच ग्राहकांपैकी एक बुक क्लबचा सदस्य असतो. १५ ते २४ या वयोगटातील व उच्च उत्पन्न गटातील व्यक्तींचे प्रमाण बुक क्लब सदस्यत्वामध्ये जास्त दिसते.

* बुक क्लबमुळे अनेक नव्या लेखकांची व पुस्तकांची व्यापक ओळख होते. बुक क्लबद्वारे पुस्तकाची माहिती लाखो सदस्यांपर्यंत जाते. परिणामी त्या पुस्तकाची विक्री दुकानातही अधिक होते.

* तीन मुख्य ब्रिटिश ठोक विक्रेते - द, गार्डनर्स आणि बेरहॅम्स.

* आणखी काही मुख्य विक्रेते : आटोकर्स, बुक्स एटसेट्रा, ब्लॅक वेल्स, हॅचाईस्, इन्सॉन्स

* तेरा ब्रिटिश विद्यापीठांत प्रकाशनव्यवसायावरचे अभ्यासक्रम पदवीपूर्व व पदव्युत्तर वर्गांसाठी घेण्यात येतात. या पदवीधरांना सहजपणे प्रकाशनक्षेत्रात नोकऱ्या मिळू शकतात.

* ब्रिटनमध्ये तीस हजारावर वाचकगट असून त्यात वाङ्मयीन दर्जेदार कलाकृतींवर वाचक आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतात. विक्रम सेठ, डेव्हिड गुटरसन, लुई इ बर्नियर वगैरे लेखकांना या वाचकगटांचा प्रतिसाद उत्तम मिळाला.

* यु. एस. ओऱ्हाह विनफ्रे ही कंपनी दरमहा एका पुस्तकाची शिफारस करते, आणि २ कोटी १० लाख वाचकांपर्यंतला पुस्तकाची माहिती पोचवली जाते.

* पुस्तकांची नवनवी दुकाने मोठ्या प्रमाणावर निघत आहेत आणि त्यातील वातावरण वाचकांना आकृष्ट करील असे अनौपचारिक ठेवण्यावर भर दिला जातो.

* बेस्टसेलर्सच्या यादीत गाजणाऱ्या पुस्तकांपैकी ८० टक्के पुस्तकांवर वृत्तपत्रात साधी परीक्षणेही येत नाहीत असे एका सर्वेक्षणात आढळते आहे.

* पुस्तके ही केवळ पुस्तकांच्या दुकानातच विकली जातात असे नाही. आज ती सुपर मार्केटस्, हॉटेल्समधील काउंटर्स, ऐतिहासिक स्थळे, म्युझियम्स, शाळा-महाविद्यालयातील डिसप्ले, बुक क्लब्ज, स्टेशनरी दुकाने, विमानतळ, बस स्टँड, फूटपाथ, जत्रा, ग्रंथप्रदर्शने, मोबाईल वाहने- इत्यादी ठिकाणीही उपलब्ध असतात. मात्र ७५ टक्के विक्री दुकाने, स्टेशनरी दुकाने, सुपर मार्केट व विक्री केंद्रे यातच होते.

* इंग्लंडमध्ये १९९० मध्ये पुस्तकांची विक्री १५१ कोटी पौंडांच्या घरात होती. १९९७ मध्ये ती २७४.५ कोटी पौंड एवढी वाढली.

* इंग्लंडमधील पाच सर्वांत मोठे प्रकाशक - ट्रॅन्सवर्ल्ड, हॉडर हेडलाइन, रँडम हाऊस, पेंग्विन, हार्पर कॉलिन्स.

* १९९७ -१९९८ मध्ये इंग्लंडमध्ये ग्रंथालयांनी ९.३० कोटी पौंड रकमेची पुस्तके खरेदी केली. ब्रिटनमधील एकूण ग्रंथ व्यवहारात या विक्रीचे प्रमाण पाच टक्के पडते.

* १९९९ हे वर्ष इंग्लंडमध्ये नॅशनल वाचन वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्यात सर्व ग्रंथालये आणि २२७ ॲस्डा स्टोअर्सनी भाग घेतला. त्याद्वारे एक हजार ग्रंथपालांना आपापल्या ग्रंथालयात संपूर्ण कुटुंबासाठी वाचन संस्कृतीच्या विकासाच्या



दृष्टीने उपयुक्त कार्यक्रमांचे प्रशिक्षण देण्यात आले. निरनिराळ्या सार्वजनिक उद्यानांमध्ये १२० मोबाइल लायब्ररी व्हॅन्स उभ्या करण्यात आल्या.

* इंग्लंडमध्ये १९९७-१९९८ मध्ये ग्रंथालयांतून ५० कोटी पुस्तके वाचण्यासाठी वाचकांनी नेली. त्यात ५५ टक्के पुस्तके प्रौढांची होती तर २० टक्के पुस्तके बालसाहित्याची होती. एकूण लोकसंख्येच्या ८.५ टक्के लोक ग्रंथालयांचा लाभ घेतात असे दिसते.

* इंग्लंडमध्ये १९९९ साली दोन लखापेक्षा जास्त पुस्तके संग्रही असणारी २७३ ग्रंथालये होती. १ लाख ते २ लाख पुस्तके असणारी ३७० ग्रंथालये होती. आणि एक लाखापेक्षा कमी पुस्तके असणारी २७४३ ग्रंथालये होती.

* ग्रंथालयातील पुस्तकांच्या खरेदीत कथाकादंबऱ्या (३० टक्के), माहितीपूर्ण पुस्तके (३५ टक्के), बालसाहित्य (१४ टक्के), वितरणासाठी देण्यात न येणारे संदर्भ ग्रंथ (१५ टक्के) अशा प्रमाणात रक्कम खर्च होते.

* १९९७ मध्ये २२९००० जर्नल्स जगभरात निघत होती असे उलरिच्स् इंटरनॅशनल पिरियॉडिकल डिरेक्टरीवरून दिसते. १९८९-९० मध्ये ही संख्या १११९५० होती. १९७१-७२ मध्ये ती फक्त ५० हजार होती.

* १९९८ साली इंग्लंडमध्ये मुलांची १२ कोटी पुस्तके विकली गेली आणि त्यांची किंमत ४१.५ कोटी पौंड होती. मुलांची पुस्तके विकत घेणाऱ्या ग्राहकांपैकी ५२ टक्के ग्राहक २५ ते ४४ वयोगटातील होते. बालसाहित्य खरेदीत ७७ टक्के महिला ग्राहकांचा भाग होता. ६३ टक्के घरात १५ वर्षे वयाच्या आतील मुले होती. ४३ टक्के ग्राहकांनी पुस्तके बघून ती विकत घेतली. फारशी चिकित्सा न करता, वा पूर्वनियोजन न करता त्या त्या वेळच्या मन:स्थितीप्रमाणे पुस्तके विकत घेणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते.

* पुस्तके विकत घेताना मुलांच्या दृष्टीने कोणत्या गोष्टींना प्राधान्य मिळते याची पाहणी केल्यावर काय आढळले ? पुस्तकाचे मुखपृष्ठ बघून पुस्तक घेण्याचे प्रमाण ३६ ते ५० टक्के असे वेगवेगळ्या वयोगटानुसार दिसते. पुस्तकाचे नाव बघून ते घेणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण पंचेचाळीस टक्के आढळते. मलपृष्ठावरील मजकूर वाचून ४० ते ६० टक्के मुले पुस्तके घेतात. पुस्तकातील चित्रांना महत्त्व ४ ते ७ वयोगटातील सत्तर टक्के मुले देतात. १४ वर्षावरील १०-२० टक्केच मुले चित्रांमुळे पुस्तके घेतात. इतरांच्या शिफारशीमुळे तीसचाळीस टक्के मुले पुस्तके घेतात. पुस्तकांचे संच घेण्यात सर्वांनाच रस वाटतो. (८० टक्के) परिचित व्यक्तिरेखांमुळे कथानकात त्यांचा जीव जास्त रमतो.

* १९९४ मध्ये ८०८ कोटी पौंड रकमेची इंग्लंडमधील बालपुस्तके परदेशात विकली गेली. त्याशिवाय सहआवृत्त्या भाषांतरे व मानधन या पोटी ७ कोटी पौंडांची कमाई ब्रिटनला झाली.

* १९९७-९८ मध्ये ज्यांची पुस्तके अधिक वाचकांनी ग्रंथालयातून वाचण्यास नेली असे लेखक - कॅथरिन कूकसन, डॅनिएल स्टील, डिक फ्रॅन्सिस, जोसेफाइन कॉक्स, रूथ रँडोल, जॅक हिगिन्स, ॲगाथा ख्रिस्ती, एमा ब्लेअर, टेरी प्रॅटचेट, बार्बरा टेलर ब्रॅडफोर्ड, व्हर्जिनिया ॲन्ड्र्यूज, डीन आर कून्टझ, रोझमंड पिलचेर, मॉव्ह बिनची, हॅरी बौलिंग, ऑर्ड्र होवाड्, बर्नार्ड कॉर्नवेल, एलिस पीटर्स, विल्बर स्मिथ, मेरी हिगिन्स क्लार्क.

**- शंकर सारडा**

# साहित्यवार्ता

## जानेवारीत कऱ्हाडला ७६वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन

७६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कऱ्हाडला पुढील वर्षी जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होणार आहे.

महामंडळाची बैठक पुणे येथे झाली. कऱ्हाडला संमेलन घेण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. महामंडळाने अपवाद करून ७५ व्या व ७६ व्या संमेलनाची ठिकाणे व तारखा गेल्या वर्षी जाहीर केल्या होत्या. त्यानुसार ७६ वे संमेलन याच वर्षी डिसेंबरमध्ये सोलापूरला होणार होते; परंतु पुण्यात झालेल्या ७५ व्या संमेलनात संयोजकांनी कवींचा अपमान केला अशी टीका करून सोलापूरच्या संयोजकांनी नियोजित संमेलन भरविण्यास नकार दिला. त्यामुळे महामंडळाने अन्य संस्थांच्या निमंत्रणांचा विचार केला. महाराष्ट्र साहित्य परिषदेची कऱ्हाड शाखा व कऱ्हाड जिमखाना यांच्या वतीने ७६ व्या संमेलनाचे निमंत्रण देण्यात आले आहे. अकलूज, अक्कलकोट व नाशिक येथूनही संमेलन घेण्याची तयारी दाखवण्यात आली होती. यापूर्वी आणीबाणीच्या काळात दुर्गाबाई भागवत यांच्या अध्यक्षतेखाली कऱ्हाडला झालेले संमेलन त्यांच्या भाषणाने गाजले होते.

नियोजित संमेलनाच्या अध्यक्षांची निवड प्रक्रिया वीस ऑगस्टला मतदार यादीच्या प्रकाशनाने सुरू झाली. २७ ऑक्टोबरला मतमोजणी होईल. डॉ. म. वि. गोखले हे निर्वाचन अधिकारी आहेत.

भोपाळची मध्य प्रदेश मराठी साहित्य परिषद ही महामंडळाची समाविष्ट संस्था आहेच; पण आता छत्तीसगड हे राज्य नव्याने स्थापन झाल्याने विलासपूरच्या छत्तीसगड मराठी साहित्य परिषदेलाही समाविष्ट संस्था म्हणून महामंडळाने मान्यता दिली. या परिषदेच्या छत्तीसगडमध्ये पाच शाखा आहेत.

## 'नाट्यसंहिता पेढी'ची स्थापना

सवंग करमणुकीच्या पलीकडे जाणारे व जाणिवा विकसित करणारे नाटक शोधण्याच्या दृष्टीने 'सुधाताई मांडके मराठी नाट्यसंहिता पेढी' स्थापन करण्यात येत असल्याची माहिती ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू व सुधीर मांडके यांनी दिली.

मांडके ह्युमन हॅपीनेस फाउंडेशनतर्फे मराठी नाट्य परिषदेच्या माजी उपाध्यक्षा सुधाताई मांडके यांच्या स्मरणार्थ हा उपक्रम राबवला जाणार आहे.

प्रयोग न झालेल्या नाट्यसंहिता या उपक्रमासाठी स्वीकारल्या जातील. पुढच्या तीन महिन्यांत जमा होणाऱ्या संहिता अभ्यास मंडळ वाचेल. त्यानंतरही दर तीन महिन्यांनी येणाऱ्या संहितांचे वाचन केले जाईल. यातील चांगल्या संहितांचे प्रयोग व्हावेत, यासाठी प्रयत्न केले जातील. अभ्यास मंडळाने सुचवलेल्या संहितेचा प्रयोग अमेय नाट्यसंस्थेतर्फे केला जाईल. वर्षाच्या अखेरीस तीन



उत्कृष्ट संहितांना पाच हजार, तीन हजार व दोन हजार रुपये व गौरवचिन्ह देण्यात येईल.

नाटक हे चंगळवादाचा भाग बनले आहे. अशा वेळी चांगले नाटक रसिकांना पाहता यावे, यासाठी चांगली संहिता, लेखक व नाट्यनिर्माते यांची गाठ घालून देण्याचा प्रयत्न पेढीतर्फे केला जाईल, असे माधव वझे यांनी सांगितले.

## अण्णा भाऊ साठे स्मृतिदिनाचे पुण्यातील कार्यक्रम

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यात विविध संस्था, संघटनांतर्फे त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे शहराध्यक्ष परशुराम वाडेकर यांनी 'पुणे महापालिकेतर्फे संकल्पित सांस्कृतिक भवन त्वरित बांधावे' अशी मागणी केली.भारिप-बहुजन महासंघातर्फे सारसबाग येथील अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार घातले.

'सातारा रस्त्यावरील अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकाचे काम त्वरित सुरू करावे' अशी मागणी करण्यात आली. भारतीय जनता पक्ष अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने सारसबाग येथील अण्णाभाऊ साठे पुतळ्यासमोर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

बिबवेवाडी येथील अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकास आमदार विश्वास गांगुर्डे यांनी पुष्पहार अर्पण केला. 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचार यात्रा' काढण्यात आली.

शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे रवींद्र माळवदकर यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातला. 'मातंग एकता आंदोलना'तर्फे प्रा. सतीश तराळ यांचे व्याख्यान आयोजिण्यात आले होते. अध्यक्षस्थानी रमेश बागवे होते. याप्रसंगी स्थायी समिती अध्यक्ष सुभाष जगताप, नगरसेविका सरस्वती शेंडगे, लक्ष्मी सोनवणे आदी उपस्थित होते.

शहर कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सोपानराव जगताप यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शहर झोपडपट्टी सुरक्षा दलातर्फे अण्णा भाऊ साठे यांना आदरांजली वाहण्यात आली. बहुजन रयत परिषद, आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद प्रतिष्ठान, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वधू-वर सूचक मंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे युवा मंच, शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, अण्णा भाऊ स्मारक संस्था आदी संस्था-संघटनांच्या वतीनेही आदरांजली वाहण्यात आली.

## मिळून साऱ्याजणी : तेरावा वर्धापन दिन

'मिळून साऱ्याजणी' या मासिकाच्या १३व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. दूरचित्रवाहिन्यांवरील मालिकांमधून चुकीच्या पद्धतीने स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण केले जाते. समाजातील नैतिकतेची संकल्पनाच यामुळे खूप संकुचित झाली आहे, असे मत 'देहभान' या नाटकाचे लेखक अभिराम भडकमकर यांनी व्यक्त केले.

समाजातील अस्वस्थ करणाऱ्या मुद्यांशी संबंधित माणसे, त्यांचे आंतरिक संघर्ष याचा आधार 'देहभान' या नाटकाने घेतला आहे. विज्ञानाची प्रगती झाली तर खरोखरच पुरोगामी विचारसरणी आपण आंगिकारली आहे का ? काळ बदलला तरी परिस्थितीत बदल होत आहे का ? अशा अनेक प्रश्नांतून देहभान नाटकाची निर्मिती झाली.

सुलभा देशपांडे यांनी लहानपणापासून मनावर झालेले कलेचे संस्कार, नवनाट्य चळवळ, बालनाट्यभूमी यांच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले. ज्या काळात मुली घराबाहेरही फारशा पडत नव्हत्या त्या वेळी केवळ घरातील कलाविषयक संस्कारामुळे आम्ही नाटकांबद्दल विचार करत होतो, नाटकात काम करत होतो. कलेसाठी परिश्रम घ्यावे लागतात हे लहानपणीच मनात रुजले होते. यश मिळविण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी लागते. धडपड, परिश्रम, कामातील सातत्य व एकाग्रता असेल तरच हे यश मिळू शकते. समाजातील घडामोडींबद्दल विचार, अस्वस्थता यातूनच निर्मितीक्षमता वाढीस लागते. कोणत्याही कलाविष्कारासाठी ही निर्मितीक्षमता आवश्यक असते, असे त्या म्हणाल्या.

जगात सध्या एक प्रकारची तणावाची परिस्थिती आहे. अशा वेळी समाजात जीवनावश्यक अस्वस्थता निर्माण करण्याचे काम 'मिळून साऱ्याजणी' करत आहेत, अशी भावना संपादिका विद्या बाळ यांनी व्यक्त केली.

या वेळी 'वाचू आनंदे' हा मराठी भाषेवर भाष्य करणारा संगीतनाट्य कार्यक्रम सादर करण्यात आला. सूत्रसंचालन सुजाता देशमुख यांनी केले. संपादकीय मंडळातील शोभा भागवत आणि डॉ. गीताली या वेळी उपस्थित होत्या.

## जिल्हास्तरावरील ग्रंथालयांना अर्थसहाय्य

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये समृद्ध व्हावी यासाठी कोलकता येथील राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानतर्फे समान निधी योजना व प्रतिष्ठान निधी योजना अशा दोन योजना राबविल्या जातात.

जिल्हा स्तरावरील सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत विस्तार व बांधणी यासाठी समान निधीमधून ४ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. ग्रंथ ठेवणे व मांडणी यासाठी दरवर्षी ६,००० रुपये, परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग, ग्रंथप्रदर्शने यांच्या आयोजनासाठी जास्तीत जास्त ५० हजार रुपये तर ग्रामीण ग्रंथ केंद्रे व फिरती ग्रंथालये सेवा वाढविण्यासाठी जास्तीत जास्त २० हजार रुपये अर्थसहाय्य समान निधीतून दिले जाते. प्रतिष्ठान निधी योजनेतून जास्तीत जास्त ५० हजार रुपये मदत दिली जाते. उपरोक्त योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे, नाशिक, मुंबई येथे अर्ज व अधिक माहितीसाठी संपर्क साधावा, असे आवाहन ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

## 'महाराष्ट्र इंडस्ट्रीज डायरी' : अकरावी आवृत्ती

'राज्यातील उद्योगधंद्यांची माहिती असलेल्या 'महाराष्ट्र इंडस्ट्रीज डायरी'ची अकरावी आवृत्ती मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांच्या हस्ते नुकतीच प्रकाशित झाली.

याबरोबरच गुजरात राज्याची पहिली 'गुजरात इंडस्ट्रीज डिरेक्टरी'ही प्रकाशित करण्यात आली. वसंतराव मराठे यांनी १९७३ मध्ये 'ठाणे इंडस्ट्रियल पब्लिकेशन' या नावाने सुरू केलेल्या या सूचीचे आता पुस्तकाबरोबरच सीडी रॉममध्येही प्रकाशन झाले आहे. इंटरनेटवरही ही सूची उपलब्ध आहे. कंपनीच्या वेबसाईटला प्रत्येक महिन्याला सहा लाख ग्राहक भेट देतात.



## तुकारामांनी रचलेली पांडुरंगाची आणखी एक आरती उपलब्ध

संत तुकाराम महाराजांनी रचलेली पांडुरंगाची आणखी एक आरती उपलब्ध झाली आहे. तुकोबांच्या अभंगाच्या विविध गाथा प्रकाशित झाल्या आहेत. या गाथांमध्ये नसलेले व वारकऱ्यांमध्येही प्रचलित नसलेले, असे तीन अभंगही मिळाले आहेत. पुणे येथील डहाणूकर कॉलनीतील प्रकाश घाटपांडे यांनी त्यांच्या घराण्यात परंपरेने चालत आलेले एक बाड वा. ल. मंजूळ यांना दिले. तुकोबांनी चोखा मेळा यांच्यावर रचलेला अभंग याच बाडात आढळला होता. हे बाड वाचताना प्र. द. अहिरराव यांना तुकोबांनी रचलेली विठ्ठलाची आरती व तीन नवे अभंग आढळले. डॉ. सदानंद मोरे, श्रीधर अण्णा मोटे व डॉ. दिलीप धोंगडे या अभ्यासकांनी ही आरती व अभंग हे तुकाबांचेच असून, ते पहिल्यांदाच समोर आल्याचे सांगितले.

सातारा परिसरातील हे बाड असून, मौखिक परंपरेतून वहीत उतरलेल्या अभंगांची ही वही आहे. ही आरती व अभंग दीडशे वर्षांपूर्वी म्हटले जात असावेत. नंतर कधीतरी ते विस्मृतीत गेले. संत तुकारामांच्या गाथेत 'जगदीश जगदीश तुज म्हणती परि या जनामाजी असशील युक्ती' ही विठ्ठलाची आरती आहे. घाटपांडे यांच्याकडील बाडात सापडलेली आरती पुढीलप्रमाणे :

'ओवाळू आरती पंढरीराया सर्वभावे शरण आलो तुझिया पाया ॥१॥
सर्व व्यापून कैसे रूप सकल तो हा गौळ्यांघरी झाला कृष्णबाळ ॥२॥
वरूप गुणातील झाला अवतारधारी तो हा पांडुरंग उभा विटेवरी ॥३॥
भक्तीचिया काजा कैसा रूपासी आला ब्रीदाचा तोडर चरणी मिटविला ॥४॥
आरते आरती कैसी ओवाळिली वाखाणिता कीर्ति वाचा परतली ॥५॥
भावभक्तीबळे होसी कृपाळू देवा तुका म्हणे पांडुरंगा तुझ्या न कळती मावा ॥६॥'

तुकोबांची गाथा १८४१ पासून अनेक वेळा प्रकाशित होऊनही नवे अभंग मिळतच आहेत. श्री. अहिरराव एक गाथा संपादित करीत आहेत, त्यात ही आरती व नवे तीनही अभंग समाविष्ट करण्यात आले आहेत. काही अभंग भक्तांमध्ये प्रचलित आहेत व फडावर गायिले जातात; पण कोणत्याही गाथेत संग्रहित झालेले नाहीत, असेही पाच अभंग अहिररावांच्या गाथेत असतील. याखेरीज साताऱ्यातील भाडगी मठातील बाडात सापडलेली तुकाराममहाराजरचित महादेवाची आरतीही नव्या गाथेत समाविष्ट करण्यात आली आहे.

## बंगलोरमधील वाचनप्रेमी भगिनींची पुस्तक भिशी

बंगलोरमध्ये मराठी पुस्तके सहजी उपलब्ध होत नाहीत. तेथील वीस पंचवीस भगिनींनी दरमहा भिशी म्हणून ठराविक रक्कम गोळा करून नवी मराठी पुस्तके घेऊन त्यांची देवाणघेवाण करण्याची कल्पना यशस्वीपणे राबवली आहे. महाराष्ट्रापासून दूर असणाऱ्या सर्वच ठिकाणी वाचनसंस्कृती व मराठी साहित्यप्रीती टिकवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. सुरेखा अलमेलकर, अस्मिता ओक, मीना जावडेकर, शर्मिला फाटक, योगिता कुलकर्णी, सुषमा चिपळूणकर प्रभृतींचा यात पुढाकार आहे.

## कानडीमध्ये 'महानायक'

महानायक ही कादंबरी म्हणजे एक विलक्षण अनुभव आहे, आणि प्रत्येक कन्नडिगाने ती

कादंबरी वाचायला हवी असे प्रतिपादन कानडीतील अग्रगण्य कादंबरीकार डॉ. भैरप्पा यांनी बंगलोर येथे महानायकाच्या कानडी आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष म्हणून केले. सपना पब्लिशिंग हाऊस या कानडीतील ख्यातनाम संस्थेने ही आवृत्ती प्रकाशित केली असून तिचे प्रकाशन दि. ९ ऑगस्ट रोजी नयना सभागृहात कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोइली यांच्या हस्ते झाले. नॅशनल बुक ट्रस्टचे माजी अध्यक्ष सुमतींद्र नाडिगा, समीक्षक डॉ. सिद्धलिंगय्या, मंगलोरचे समीक्षक रामचंद्रन या सर्वांनी 'महानायक'मधील वाङ्मयीन गुणांचा गौरव करून, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आझाद हिंद सेनेच्या आजवर बहुतांशी अज्ञात अशा पर्वाचे एवढे साधार व सर्वंकष चित्रण कानडी वाचकांपुढे प्रथमच येत आहे असे मत व्यक्त केले. सपना बुक्सचे संचालक नितिन शहा यांनी स्वागत केले. गेल्या २५ वर्षात सुमारे १४०० पुस्तके प्रकाशित केल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. भैरप्पा म्हणाले, ''सुभाषचंद्र बोस हे ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन जर्मनीला गेले, आझाद हिंद सेनेची उभारणी त्यांनी केली, आणि विमान अपघातात ते गेले एवढेच आपल्याला माहीत असते. परंतु ही कादंबरी वाचल्यावर त्यांचे जीवन किती अद्‌भुत होते हे लक्षात येते. विश्वास पाटील यांनी या कादंबरीसाठी किती परिश्रम घेतले असतील याची कल्पना पानोपानी येते. स्वातंत्र्याचे आंदोलन म्हणजे केवळ नेहरू घराण्याचे कर्तृत्व असे आपल्या मनावर ठसवण्यात आले आहे, ते किती एकांगी आहे हे 'महानायक' मुळे लक्षात येते. भारतीय राजकारणाचे एक नवे आकलन त्यामुळे होते. कानडीत यापूर्वी कोणीही सुभाषबाबूंच्या संबंधी असे सखोल लेखन केलेले नाही. प्रत्येक कानडी वाचकाने ही कादंबरी वाचायला हवी अशी मी मुक्तकंठाने शिफारस करतो.''

'महानायककार' विश्वास पाटील यांनी आपल्या भाषणात या कादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणा, तिच्यासाठी केलेले संशोधन, संबंधित स्थळांना भेटी देऊन व व्यक्तींशी चर्चा करून मिळवलेली माहिती याची कल्पना दिली. हिंदी, गुजराती, आवृत्त्यांमध्येही उत्तम स्वागत झाले असून, राजस्थानी, मल्याळी, पंजाबी, बंगाली, उडिया वगैरे भाषांतही अनुवाद चालू आहेत असे त्यांनी म्हटले. मल्याळी अनुवाद कोट्टायमच्या डी सी बुक्स या प्रकाशन संस्थेतर्फे लौकरच प्रसिद्ध होत आहे, अशीही माहिती त्यांनी दिली.

प्रा.चंद्रकांत पोकळे यांनी या कादंबरीचा अनुवाद केला आहे. त्यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. बंगलोरमधील अनेक साहित्यिक व साहित्यप्रेमी या समारंभाला उपस्थित होते. समीक्षक शंकर सारडा यांचाही यावेळी भैरप्पा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## संत तुकाराम यांच्या टपाल तिकिटाचे देहूमध्ये प्रकाशन

पिढ्यानपिढ्यांना मार्गदर्शन करता येईल, असा ज्ञानाचा ठेवा संत तुकाराम महाराजांनी दिला आहे, असे प्रतिपादन केंद्रीय संचार व माहिती तंत्रज्ञानमंत्री प्रमोद महाजन यांनी केले.

संत तुकाराम महाराजांच्या गौरवार्थ काढण्यात आलेल्या टपाल तिकिटाचे प्रकाशन महाजन यांच्या हस्ते देहूगावात झाले. अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष गोपीनाथ मुंडे होते. खासदार प्रदीप रावत, शालेय शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे, बाबामहाराज सातारकर, विधान परिषदेचे अध्यक्ष ना. स. फरांदे, आमदार गजानन बाबर, दिगंबर भेगडे, विठोबा-रखुमाई देवस्थान संस्थेचे प्रमुख प्रल्हाद इनामदार, सरपंच सुमन चव्हाण आदी उपस्थित होते.

कार्यक्रमापूर्वी मुख्य मंदिरापासून कार्यक्रमस्थळी आलेल्या दिंडीने भक्तिरसाची जोड दिली. ''तुकोबारायांच्या भक्तीच्या ओढीने मी येथे आलो'' असे सांगून महाजन म्हणाले, ''तुकारामांच्या



आख्यायिकांपेक्षा मला त्यांच्यातील मनुष्यत्व महत्त्वाचे वाटते. त्यांचे मनुष्यत्व पाहिल्यास त्यांनी साडेतीनशे-चारशे वर्षांपूर्वी लिहिलेला एकही अभंग आजपर्यंत खोटा झालेला नाही. त्यांनी सांगितलेला धर्म खरा धर्म आहे. आपल्या देशात धर्म हा कर्तव्याशी जोडलेला आहे. संत तुकारामांचे टपाल तिकीट म्हणजे इतिहासाचे लेखन आहे. त्यांचा विचार साऱ्या जगात नेणे हा त्यामागील उद्देश आहे. महाराष्ट्रात संत आणि महापुरुषांची मोठी परंपरा आहे. त्यांनी सर्व विश्वाचा विचार केला. परंतु तो मराठीतच राहिल्याने हा विचार जगात पोचविण्यासाठी टपाल तिकिटाचा वापर व्हावा, हा उद्देश आहे. तुकारामांचे चित्र असलेली नाणी तयार झाली आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. श्री. मुंडे म्हणाले, ''सर्व संत महान होते. संत तुकारामांचे तिकीट निघावे अशी येथील लोकांची मागणी होती. राज्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत संतांचा मोठा वाटा आहे. कोणत्याही गावात गेले, तरी ज्ञानेश्वर तुकारामांचे भजन, कीर्तन कानावर पडते.''

प्रा. मोरे म्हणाले, ''संतांनी विश्वात्मकाची संकल्पना सांगितली आहे. या संप्रदायास डोळसपणे समजून घेणे आवश्यक आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तर राज्याच्या सांस्कृतिक जीवनाचे श्वासोच्छ्‌वास आहेत.''

## 'साने गुरुजी, अच्युतरावांची माहिती नव्या पिढीला हवी'

''साने गुरुजींचे समर्पण व अच्युतराव पटवर्धन यांचे जीवनकार्य याबद्दलची आणखी माहिती मुख्य प्रवाहात येण्याची गरज असून, त्या दृष्टीने मानसिकता तयार होण्यासाठी हरिभाऊ लिमये यांनी लिहिलेली पुस्तके उपयुक्त आहेत,'' असे प्रतिपादन मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष रा. ग. जाधव यांनी पुणे येथे केले.

हरिभाऊ लिमये यांनी लिहिलेल्या 'आम्ही जातो आमुच्या गावा' व 'अच्युतराव पटवर्धन' या पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान अध्यक्षस्थानी होते.

प्रा. जाधव म्हणाले, ''साने गुरुजी, अच्युतराव पटवर्धन यांचे जीवनकार्य याबद्दल आणखी संशोधन व्हायला हवे. साने गुरुजी मनस्वी होते, त्यांनी प्राणार्पण का केले व अच्युतराव पटवर्धन यांनी राजकारणातून निवृत्ती का घेतली, याचे विवेचन या पुस्तकांतून आढळते.''

श्री प्रधान म्हणाले, ''ही पुस्तके म्हणजे केवळ साहित्य नसून दोन जीवनकार्यांचा परिचय आहे. साने गुरुजींची वैचारिक जडणघडण व अच्युतरावांचे जीवनकार्य यांचा अभ्यास करून ही पुस्तके लिहिली असून पुढच्या पिढीसाठी ती उपयुक्त ठरतील.''

## मालेगावमध्ये चित्रपट काढा, खर्च फक्त ५० हजार रुपये

मालेगाव शहरात अवघ्या ५० हजार रुपयांत चित्रपट निर्मिती केली जात असून या चित्रपटांना प्रेक्षकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

गेल्या पाच वर्षांत अशा १५ व्हिडिओपटांची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटांना स्थानिक आशय देऊन समाजप्रबोधनाबरोबरच करमणूक केली जाते. चित्रपटांच्या कथानकाला विनोदी झालर व प्रेक्षकांना गुणगुणायला लावणारी गीतेही या चित्रपटांमध्ये असतात.

स्थानिक हौशी कलाकारांनी बनवलेल्या या चित्रपटांना सुरुवातीला व्यावसायिक अंग नव्हते. मात्र, हा चांगला व्यवसाय होऊ शकतो हे आता तेथील लोकांच्या लक्षात आले आहे. मालेगाव की शान, मालेगाव के शोले, आज का मुगले आझम, सौदागर, गँगवार, मौत का कुँवा, दहशतवाद,

रंगे हाथ असे चित्रपट तयार केले. रीतसर सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र घेऊन शहरात व्हिडिओ व केबल टीव्हीवरून हे चित्रपट दाखवण्यास सुरुवात केली.

मालेगाव शहराची लोकसंख्या साडेसहा लाख असून येथे यंत्रमाग कामगारांचे प्राबल्य आहे. शहरात १५ चित्रपटगृहे आहेत. स्थानिक नागरिकांना आवडणारे व स्थानिक गोष्टींशी संबंधित कथानक घेऊन सहा महिन्यात हे चित्रपट पूर्ण केले जातात. ईद, गणपती, दिवाळी असे मोठे सण बघून ते रिलीज केले जातात. एडिटिंग, कॅमेरामन, कलाकार, लेखक, गायक, दिग्दर्शक व चित्रीकरणाची ठिकाणे स्थानिकच असतात. पण चित्रपटासाठी अभिनेत्री मिळणे मुश्किल असल्याने मुंबईहून पाच दहा हजार रुपयांत एखाद्या अभिनेत्रीला आणण्यात येते. ही अभिनेत्री दोन-तीन दिवसांत सर्व दृष्यांचे चित्रीकरण उरकून मुंबईला परतते.

चित्रपटासाठी लागणाऱ्या सामग्रीची कमतरता असली तरी हे कलाकार त्यावर मात करतात. ‘मालेगाव के शोले’ या चित्रपटासाठी डाकूंसाठी एवढे घोडे कोठून आणायचे ? यावर मार्ग काढण्यासाठी त्यांना सायकली देण्यात आल्या. गब्बरसिंगला गळ्यात बंदुकीच्या पट्ट्याऐवजी गुटख्याचा पट्टा देण्यात आला. त्याचप्रमाणे गब्बरसिंगच्या हातात लूमसाठी वापरतात तो धोटा देण्यात आला. मालेगावमध्ये रेल्वे नसल्यामुळे वीरू व जय लक्झरी बसमधून गावात येतात असे दाखवण्यात आले.

चित्रीकरणासाठी पोलिसांची परवानगी घेतली जाते. चित्रपट रिलीज करताना प्रिमियर शो ठेवून मान्यवरांना बोलावले जाते. या चित्रपटांसाठी तिकिटांचा दर नेहमीपेक्षा दुप्पट म्हणजे १० रुपये असतो. हे चित्रपट प्रदर्शित करताना त्यांची खास पोस्टर्स लावून जाहिरात केली जाते.

## यूजीसी’च्या अध्यक्षपदी डॉ. निगवेकर

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या (यूजीसी) अध्यक्षपदी डॉ. अरुण निगवेकर यांची निवड झाली. ही निवड साडेतीन वर्षांसाठी आहे.

डॉ. सी. डी. देशमुख यांच्यानंतर या पदावर निवड झालेले ते दुसरे मराठी अधिकारी आहेत.

अध्यक्षपदी निवड होण्याआधी डॉ. निगवेकर हे ‘यूजीसी’चे उपाध्यक्ष होते. डॉ. हरी गौतम अध्यक्षपदावरून निवृत्त झाल्यानंतर हंगामी अध्यक्ष म्हणून ते काम पाहत होते. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची शोध समिती नेमण्यात आली होती.

डॉ. निगवेकर हे गेली चाळीस वर्षे उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. उच्च शिक्षणातील गुणवत्ता प्रमाणीकरणासाठी राष्ट्रीय संस्था (राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद-‘नॅक’) स्थापण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. बंगळूरच्या या संस्थेचे ते पहिले संचालक होते. सन १९९८-२००० या काळात ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यानंतर उपाध्यक्ष म्हणून ते ‘यूजीसी’त दाखल झाले.

पदार्थविज्ञानातील डॉक्टरेनंतरचे संशोधन त्यांनी स्वीडनमधील विद्यापीठात केले. त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात प्राध्यापक होते.

ते म्हणाले, ‘विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी उच्च शिक्षण निधी उभारणे, विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन शाखांचे शिक्षण घेता येणे, विद्यापीठांप्रमाणेच महाविद्यालयांनाही गुणवत्ता अनुदान देणे, दुर्बल घटकांपर्यंत उच्च शिक्षण नेणे, दूरशिक्षणासाठी अत्याधुनिक साधनांचा वापर करणे इ. दहाव्या योजनेतील बाबी प्रत्यक्षात येण्यासाठी मी प्रयत्न करेन. पुढील वर्षी ‘यूजीसी’चा सुवर्णमहोत्सव



असून, त्यानिमित्ताने विशेष योजना आखणार आहे.’’

## अभ्यासक्रमातून भगवेकरणाचा मजकूर वगळण्यास केंद्र सरकार तयार

शिक्षणाचे ‘खऱ्या अर्थाने’ भगवेकरण करणारा आक्षेपार्ह मजकूर माध्यमिक विद्यालयांच्या अभ्यासक्रमातून वगळ्याची तयारी केंद्र सरकार आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने सर्वोच्च न्यायालयात दर्शविली.

तीन न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे सॉलिसिटर जनरल हरिष साळवे यांनी सरकारचे निवेदन केले. न्यायालयाला आक्षेपार्ह वाटणारा मजकूर ‘नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क फॉर सेकंडरी एज्युकेशन’मधून वगळण्याची सरकारची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारच्या या भूमिकेला फिर्यादी पक्षाच्या वकिलांनी आक्षेप घेतला. माध्यमिक विद्यालयांचा संपूर्ण अभ्यासक्रम आढाव्यासाठी ‘सेंट्रल ॲडव्हायजरी बोर्ड ऑफ एज्युकेशन’पुढे ठेवण्यास सरकार का कचरत आहे, असा सवाल त्यांनी केला. गेल्या आठ वर्षांत या मंडळाची फेररचना झाली नसल्याचे सांगून विपर्यस्त मजकूर अभ्यासक्रमात घुसडण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. या मुद्द्यावर न्यायालयाने मध्यममार्ग काढून सरकार या मंडळाची फेररचना करेपर्यंत नवा अभ्यासक्रम राबविण्याची परवानगी दिली.

शाळांमध्ये धार्मिक बाबी व नैतिक मूल्यांची शिकवण देण्यात येऊ नये, या मताशी न्यायालयाने असहमती दर्शविली. सध्याच्या प्रदूषित वातावरणातून बाहेर पडण्यासाठी नैतिक मूल्यांची शिकवण शालेय पातळीपासून द्यायला हवी, असे स्पष्ट मत खंडपीठाने व्यक्त केले.

## ‘ऐतिहासिक पोवाड्यांच्या रचनेत य. न. केळकरांचे नाव अजरामर’

‘ऐतिहासिक पोवाड्यांच्या रचनेत इतिहास संशोधक यशवंत नरसिंह उर्फ अण्णा केळकर यांचे नाव अजरामर आहे.’ अशा शब्दांत प्रा. श. श्री. पुराणिक यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

केळकर यांच्या जन्मशताब्दीची सांगता समारोह १९ जुलै रोजी झाला. त्यानिमित्त भारत इतिहास संशोधक मंडळाच्या राजवाडे सभागृहात कार्यक्रम झाला. डॉ. अ. रा. कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. श्री. पुराणिक यांनी लिहिलेल्या ‘य. न. केळकर - एक ऐतिहासिक पोवाडा’ या पुस्तकाचे प्रकाशनही या वेळी झाले.

प्रा. पुराणिक म्हणाले, ‘‘ऐतिहासिक पोवाड्यांच्या क्षेत्रात यशवंत केळकर हेच पूर्वज आणि वंशजही ठरले आहेत. कोणताही भाव नसताना आणि पैसे मिळण्याची अजिबात शक्यता नसताना त्यांनी पोवाड्यांची रचना करण्यात स्वत:ला झोकून दिले होते. हा त्यांच्यावर न. चिं. केळकर यांनी केलेल्या संस्काराचाच प्रभाव होता. विद्येच्या क्षेत्रातही पराक्रम गाजविता येतो हेचं त्यांनी दाखवून दिले. त्यांचे जीवन हे पोवाड्यासारखेच वीरकाव्य ठरले.’’

केळकर यांच्या स्नुषा मृणालिनी केळकर यांनी ‘अण्णा एक देवमाणूस’ या मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. परशुराम जोशी यांनी प्रास्ताविक केले. विनायक केळकर यांनी आभार मानले.

## डॉ. नारळीकर सच्चे समाजवादी शास्त्रज्ञ : दीक्षित

‘‘विज्ञान हे व्यक्तिनिष्ठ नसते. ते खऱ्या अर्थाने समाजवादी असते. त्या अर्थाने डॉ. जयंत

नारळीकर हे आधुनिक युगातील सच्चे समाजवादी शास्त्रज्ञ आहेत.'' असे 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी सांगितले.

चित्रलेखा पुरंदरे यांनी लिहिलेल्या 'खगोल अभ्यासक जयंत नारळीकर', या पुस्तकाचे प्रकाशन ज्ञानप्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट यांच्या हस्ते झाले, अध्यक्षस्थानी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे होते.

अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब पुरंदरे म्हणाले, ''माझी स्नुषा चित्रलेखा हिने लिहिलेल्या चरित्राचे महत्त्व चरित्रनायकही जाणतात. डॉ. नारळीकर हे आपल्या ज्ञानाचा उपयोग विज्ञान, गणिताचे विद्यार्थी घडविण्यात करतात. डॉ. नारळीकरांविषयी कुतूहल वाढविणारे हे पुस्तक आहे.''

श्री. दीक्षित म्हणाले, ''अतिशय अवघड गोष्ट सोपी करून सांगण्याचे त्यांचे वैशिष्ट्य, त्यांचे लेखन वाचताना प्रकर्षाने जाणवते. आजकाल मिरविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. प्रसिद्धिविन्मुखतेचीच प्रसिद्धी केली जाते. अशा वातावरणात डॉ. नारळीकरांचा साधेपणा विशेषत्वाने जाणवतो.''

डॉ. बापट म्हणाले, ''डॉ. नारळीकर यांच्या संशोधनाची झलक या पुस्तकातून घडते. कामात अभिनवता असली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो. अंतरंगगुणांनी समृद्ध असा हा चरित्रनायक आहे. स्वत:बरोबर वैज्ञानिकांची पिढी तयार करण्याचे काम ते करीत आहेत. खगोलशास्त्राची पायाभरणी त्यांनी केली आहे.''

''डॉ. नारळीकर मुळात अतिशय साधे आहेत. त्यांचा हा साधेपणा या पुस्तकात उतरला आहे,'' असे डॉ. प्रकाश तुपे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

चित्रलेखा पुरंदरे यांनी सांगितले, की नारळीकरांच्या व्यक्तिमत्त्वाची वैश्विक उंची, योग्यता याचे दडपण हे पुस्तक लिहिताना येत होते. त्यांचे सोन्यासारखे व्यक्तिमत्त्व शब्दबद्ध करणे कलाकुसरीचे काम होते. पण यात उणीव राहिली असली, तर तो दोष माझा समजावा. हे पुस्तक लिहिताना सतत एक ऊर्जा जाणवत राहिली.''

## कवीला कवितेसारखा दुसरा गुरू नसतो : बापट

''कवितेवरच्या निष्ठेने व कवितेतून मिळणाऱ्या आनंदासाठीच कविता लिहायला हवी. कवींनी 'स्वत:चीच' कविता लिहावी. एखादा महाकवीही कवींचा गुरू होऊ शकणार नाही; कवीला कवितेसारखा दुसरा गुरू नसतो.'' असे ज्येष्ठ कवी वसंत बापट यांनी सांगितले

श्री. बापट यांचा २५ जुलै रोजी ऐंशीवा वाढदिवस होता. या निमित्ताने ते बोलत होते. सध्याच्या कवितेचा स्वतंत्र तोंडवळा नष्ट झाला आहे आणि ती सभारंजनी होत आहे. कवीची निष्ठा कमी पडल्याचे ते लक्षण आहे, असे ते म्हणाले, ''व्यक्तिवैशिष्ट्य गमावल्यानेच कवितेचे अवमूल्यन होत आहे. नक्कल करून परंपरा घडत नाही. काही कवी नवोदितांच्या कवितेत दुरुस्त्या करून त्या कवितेचा आत्मा नष्ट करतात. अशी गुरुपरंपरा नवोदितांनी स्वीकारता नये. त्यांनी निष्ठेने लिहायला हवे.''

कवींनी भरपूर प्रवास करून आपला समाज, संस्कृती समजून घेतली पाहिजे. हे अनुभव, समाजजीवनाचे संदर्भ आता झिरपले तर ते कधीही योग्य वेळी प्रकट होतात याची जाणीव त्यांनी करून दिली. कवितेची लय, ताल सुटत चालला आहे. हा केवळ आकृतिबंधाचा प्रश्न नाही; काव्यात्मता हरवत चालल्याची ती खूण आहे, असे त्यांनी सांगितले.

अलीकडच्या काळात सर्वांत जास्त स्फूर्तिगीतांची रचना करणारा कवी म्हणून श्री बापट यांचा



उल्लेख करावा लागेल. राष्ट्रसेवा दलातर्फे लीलाधर हेगडे, सुधाताई वर्दे यांच्या सहकार्याने कलापथकाचे प्रयोग ते करीत असत. समाजवादी चळवळीला ओहोटी लागल्याने सेवादलाचे कामही थंडावत गेले. पण आसपास पाहिले तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह सर्वच चळवळी थंडावत चाललेल्या दिसतील. कारण आता तत्त्वज्ञानाऐवजी अन्य कोणत्या तरी आमिषाने माणसे चळवळीत उतरू लागली आहेत.''

## हॅरी पॉटरच्या निमित्ताने...

जे. के. रोलिंग या ब्रिटिश लेखिकेच्या हॅरी पॉटरच्या साहसी कथामालिकेने सध्या जगभर अभूतपूर्व लोकप्रियता संपादन केली आहे. दोन वर्षांपूर्वी हॅरी पॉटर अँड द गॉब्लेट ऑफ फायर हा या साहसकथेचा चौथा खंड प्रकाशित झाला. तेव्हा त्याच्या आगाऊ पुस्तकनोंदणीत तिसऱ्या खंडापेक्षा आठपट वाढ झाली होती. तब्बल ३ लाख ५० हजार प्रतींची आगाऊ मागणी इंटरनेट बुकसेलरकडे नोंदवली गेली होती. (या पूर्वीचा विक्रम जॉन ग्रिशॅमच्या 'द ब्रेदर्न' चा ४३ हजार प्रतींचा होता !) दि. १० जुलैला जेव्हा ते पुस्तक प्रत्यक्ष दुकानात आलं, तेव्हा एका बार्नस अँड नोबलमधून त्या रात्रीपर्यंत ५ लाख २ हजार प्रतींची हातोहात विक्री झाली होती.

आणि आता 'हॅरी पॉटर अँड ऑर्डर ऑफ द फिनिक्स' या पाचव्या खंडाची वाचक चातकाप्रमाणे प्रतीक्षा करीत आहेत. दरम्यानचया काळात लेखिका विवाहपाशात अडकल्याने या खंडाचे लेखन लांबणीवर पडले आणि जून २००३ च्या आधी तो प्रकाशित होण्याची शक्यता नाही असे या स्कॉलॅस्टिक या अमेरिकन प्रकाशनगृहाने दिलेल्या ताज्या वार्तेमुळे तर जगभरचे चाहते खंतावले आहेत. आपल्याच कपोलकल्पित जादूगारविश्वात मन:पूत रमून आबालवृद्ध वाचकांनाही त्या विश्वाची सहल घडवणाऱ्या आपल्या या लाडक्या लेखिकेचे लेखन लवकर पूर्ण होवो, यासाठी हे चाहते देव पाण्यात घालून बसले आहेत.

'हॅरी पॉटर अँड द सॉर्सरेस स्टोन' या पहिल्या खंडावर आधरित त्याच नावाचा चित्रपट वॉर्नर ब्रदर्सने गेल्या नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित केला, त्या चित्रपटानेदेखील लोकप्रियतेचे पूर्वीचे सारे विक्रम मोडले. अमेरिकेत प्रदर्शित झाल्यावर पहिल्या दहा दिवसांत या चित्रपटाने १८ कोटी ८० लाख डॉलर्सचा (म्हणजे १३ कोटी ३० लाख पौंडांचा किंवा आपल्या चलनात सांगायचे तर नऊ अब्ज रुपयांचा !) धंदा केला. ज्युरॅसिक पार्क, टॉय स्टोरी- साऱ्या जुन्या गाजलेल्या चित्रपटांचे लोकप्रियतेचे विक्रम हॅरी पॉटरने बॉक्स ऑफिसरवर लोळवले ! 'चिटी चिटी बँग बँग' लिहिणाऱ्या इयान फ्लेमिंगइतकी लोकप्रियता आपल्या लेखिकेला मिळवून देणाऱ्या, ब्रिटिश रुपेरी पडद्यावर जेम्स बाँडनंतर इतका तुफान लोकप्रिय ठरलेल्या हॅरी पॉटरमध्ये असं आहे तरी काय ?

चित्रपटाचे निर्माते डेव्हिड हेमन आणि दिग्दर्शक क्रिस कोलम्बस या विक्रमी यशाचे श्रेय मूळ कादंबरीलेखिका जोआन कॅथलिन रोलिंग हिच्या असामान्य कल्पनाशक्तीला, उत्कंठावर्धक वर्णनशैलीला देतात. लेखिकेने आपल्या समृद्ध शब्दसंपदेने हॉग्वर्ट या कल्पित जादूविद्या महाविद्यालयातील जादूकला - विद्यार्थ्यांचे जे काही अद्भुत विश्व कांदबरीत रेखाटले आहे, ते रुपेरी पडद्यावर कसे साकारते, हे बघण्याच्या उत्कंठेतूनच प्रेक्षक चित्रपटाला गर्दी करतात, हे निर्माते दिग्दर्शक स्वत:च मान्य करतात; किंबहुना अत्यंत वेगाने चित्रकथा पुढे सरकवताना, आपल्या प्रेक्षकांनी मूळ कादंबरी वाचलेली आहेच, हे त्यांनी गृहीत धरलेलेच आहे...

प्रतिभासंपन्न जे. के. रोलिंगची लेखनवैशिष्ट्ये बघता 'हॅरी पॉटर' मालिका अभिजात साहित्यगुणांमुळे एक टिकाऊ, दर्जेदार क्लासिक ठरेल, हे निर्विवाद ! **(महाराष्ट्र टाइम्समधून)**

## गझलमधील काव्य महत्त्वाचे

'गझल हा काव्यप्रकार मराठीत रुजेल; पण त्यातील काव्य महत्त्वाचे आहे. कोणत्याही रचना बंधात असली तरी कविता ही बावनकशी कविताच असली पाहिजे,' असे प्रसिद्ध गीतकार सुधीर मोघे यांनी सांगितले.

कॉन्टिनेंटल प्रकाशनातर्फे सुधीर कुबेर यांच्या 'तू मी नी ते' या गझल संग्रहाचे प्रकाशन झाले.

'गझलमध्ये काव्य संगीताच्या अंगाने पेलता आले तर अधिक उत्तम होईल', ''माधव जूलियनांनी गझलवृत्तीची ओळख करून दिली; पण खऱ्या अर्थाने सुरेश भट यांनी गझलला आशय दिला. केवळ तंत्रावर हुकमत आली म्हणजे गझल लिहिता येईल, एवढी ती सोपी नसते. स्वत:ला अजमावत गझल लिहावी लागते.'' असे श्री. कुबेर म्हणाले. ''आपल्या आईच्या रसिक वृत्तीमुळे आपल्याला कवित्व लाभले. सुरेश भट यांच्या प्रोत्साहनाने व डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांच्या मार्गदर्शनाने गझल लिहू लागलो.''

प्रकाशक अनिरुद्ध कुलकर्णी यांनी आभार मानले.

## 'पौराणिक नाटकांतील प्रवेशांचे पुस्तकरूपात प्रकाशन आवश्यक'

''जुन्या ऐतिहासिक, पौराणिक नाटकांतील प्रवेश व स्वगते ही पुस्तक रूपाने प्रकाशित करणे, ही काळाची गरज असून, मराठी भाषा व तिच्या शैलीच्या दृष्टिकोनातून ती आजही उपयुक्त आहेत,'' असे मत ज्येष्ठ अभिनेते प्रभाकर पणशीकर यांनी व्यक्त केले.

नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी संकलित व संपादित केलेल्या निवडक नाट्यप्रवेशांच्या चार भागांचे आणि निवडक नाट्यस्वगते या पुस्तकाचे प्रकाशन श्री. पणशीकर यांच्या हस्ते झाले.

श्री. पणशीकर म्हणाले, ''जुन्या नाटकांचे बलस्थान हे स्वगत असे. त्या नाट्यप्रवेश व स्वगताच्या संकलनातून नव्या पिढीला जुन्या गाजलेल्या नाटकांचे, त्यातील अभिनयाचे; शब्द सामर्थ्याचे दर्शन घडेल.'' पुस्तक प्रकाशित करण्याची भूमिका सांगताना डॉ. देशपांडे म्हणाले, ''नाट्यस्वगते ही मराठी भाषेची मोठी ताकद आहे. या भाषेच्या वैभवाची नव्या पिढीला कल्पना यावी, तसचे जुन्या नाटकांतील भाषा, शैली, संवादाची पद्धत कशी बदलत गेली, हेही या पुस्तकांतून कळू शकेल.''

नितीन प्रकाशनने ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. नितीन गोगटे यांनी प्रास्ताविक केले. विनिता आपटे यांनी सूत्रसंचालन केले. त्यानंतर श्री. पणशीकर यांनी 'नटसम्राट', 'तो मी नव्हेच' आदी नाटकांतील नाट्यप्रवेश सादर केले.

## 'परदेशी गुंतवणुकीमुळे वृत्तपत्रे चालविणे कठीण : गुजराथी

परदेशी गुंतवणुकीला दिलेल्या परवानगीमुळे वृत्तपत्रे चालविणे हे यापुढे कठीण होईल, असे प्रतिपादन विधानसभेचे अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघाचा आचार्य अत्रे स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार सुधाकर सामंत यांना देण्यात आला.

गुजराथी म्हणाले, ''मी परदेशी गुंतवणुकीवर चालणारी वृत्तपत्रे आमच्या संस्कृतीशी जुळवून घेतील का याबाबत शंका आहे. या देशाने अनेक अतिक्रमणे झेलली आहेत; पण तरीही संस्कार टिकून आहेत. परदेशी भांडवलाला दिलेल्या परवानगीसह आताच्या बदलत्या काळात पत्रकारांवरील जबाबदारी मोठी आहे. त्यांनी आई व शिक्षकाच्या भूमिकेतून पत्रकारिता केली, तरच समाज तरेल.''



पत्रकार सुधाकर सामंत म्हणाले, ''कोकण वैभव' हे साप्ताहिक मी ४३ वर्षे खडतर परिस्थितीत चालविले. यापुढे ते बंद करण्याचा निर्णय घेतला होता; पण आजच्या या पुरस्कारामुळे मी प्रभावित झालो असून मी जिवंत असेपर्यंत ते कितीही कठीण परिस्थिती आली, तरी बंद करणार नाही.'' सुधाकर सामंत यांनी पत्रकार कल्याण निधीसाठी १० हजार रुपये दिले. कोकण समस्यांवर लिहिणाऱ्यांसाठी १० हजार रुपयांचा पुरस्कारही त्यांनी घोषित केला.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी प्रास्ताविक केले, कार्यवाह प्रसाद मोकाशी यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकारांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## काव्यअनुवादाचे वाचन

९ जून रोजी कोल्हापुरात वाङमय चर्चा मंडळाच्या सभेत शेल सिलव्हरसेन ह्या पाश्चात्य कवीच्या 'द गिव्हिंग ट्री' या गाजलेल्या इंगजी कवितेचा स्वैर मराठी अनुवाद डॉ. रवींद्र ठाकूर, कु. शर्मिला, सौ. नीलांबरी कुलकर्णी श्यामकात जाधव, प्राचार्य बी. एम. हिर्डेकर आदींनी सादर केला.

## ज्ञानेश्वर मुळे यांची उप-उच्चायुक्तपदी नियुक्ती

प्रसिद्ध लेखक व परराष्ट्र मंत्रालयातील संचालक ज्ञानेश्वर मुळे यांची मॅरिशसमधील भारतीय दूतावासात उप-उच्चायुक्तपदी नेमणूक करण्यात आली असून, ऑगस्ट महिन्यात त्यांनी कार्यभार स्वीकारला.

गेली काही वर्षे ते अनेक विषयांवर ललित लेखन करीत आहेत. मॉस्को व जपानच्या वास्तव्यात तेथील घडामोडींचे छायांकन करून त्याची प्रदर्शनेही त्यांनी भरवली आहेत.

## पाचवे आचार्य अत्रे साहित्य संमेलन

''प्रभावी पत्रकारिता, श्रोत्यांना हास्याने खुलवणारे असे भाषण, वाचनीय लेखनशैली आणि प्रसंग-स्वभाव प्रकार टिपणारे विनोद आचार्य अत्रे यांच्याकडे होते. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू घडले,'' असे गौरवोद्गार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व विनोदी लेखक प्रा. द. मा. मिराजदार यांनी सासवड येथे काढले.

आचार्य अत्रे यांच्या १०४ व्या जन्मादिनानिमित्त 'पाचवे आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलन' अत्रे यांच्या जन्मगावी झाले. 'आचार्य अत्रे पुरस्कारां'चे वितरण मिरासदार यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'च्या कोल्हापूर आवृत्तीचे कार्यकारी संपादक मल्हार अरणकल्ले यांना 'आचार्य अत्रे पत्रकारिता पुरस्कार', कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांना 'साहित्यिक पुरस्कार' आणि प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांना 'कलाकार पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अत्रे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष जय पुरंदरे, सचिव विजय कोलते, संमेलनाध्यक्ष प्रा. अप्पासाहेब खोत, स्वागताध्यक्ष बाळासाहेब कामथे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सासवड शाखा अध्यक्ष रावसाहेब पवार आदी उपस्थित होते.

''नवीन पिढीतील अग्रेसर कवयित्री असलेल्या अरुणा ढेरे, पत्रकार असूनही वाचनीय ललित लिहिणारे मल्हार अरणकल्ले व ज्याला शब्द-आवाजातून सर्व जण ओळखतात अशा सुधीर गाडगीळ, या तीन नामवंतांचा कऱ्हेकाठी सत्कार करताना, मला माझाच सन्मान झाल्यासारखे वाटत आहे,'' असे सांगून प्रा. मिरासदार यांनी लेखक, कवी, पत्रकार, वक्ता आदी प्रकारांत अत्रे यांनी आपली शैली कशी निर्माण केली, हे विशद केले. 'गुत्त्यात नारदमुनी' ही अत्रेंची कथा सांगून श्रोत्यांची दाद घेतली.

'प्रसन्न, प्रभावी आणि तुकोबांशी नाते सांगणारी मराठी आचार्य अत्रेंकडे होती. एवढ्या मोठ्या कर्तृत्ववान माणसाच्या नावाचा पुरस्कार घेताना मी मात्र भारावून गेलो आहे. पत्रकारितेतील धडपडीला या पुरस्काराने निश्चित बळ मिळेल,'' असे अरणकल्ले यांनी सांगितले. ''वाटेला जाणाऱ्या माणसाला शब्दांतून जागीच जागा दाखविण्याचे कसब अत्रेंकडे होते. पत्रकारिता व वक्तृत्व याच आधारे मला यशस्वीतेकडे वाटचाल करता आली,'' असे कलाकार पुरस्काराचे मानकरी सुधीर गाडगीळ म्हणाले.

''आचार्य अत्रे यांच्या घराशी माझा नातेसंबंध होता. त्यामुळे माझ्या कुळाशी नाते सांगणारा हा पुरस्कार, कला-संस्कृतीशी नाते सांगणाऱ्या सासवडमध्ये मला मिळाला. ही अत्रे यांची शाबासकी मला प्राप्त झाली'' असे डॉ. अरुणा ढेरे यांनी सांगितले.

**ज्योती ग्रंथ वार्ताचे स्वागत**

नाशिकचे एक प्रमुख ग्रंथविक्री केंद्र म्हणून वसंत खैरनार यांच्या ज्योती स्टोअर्सने आपले नाव ग्रंथप्रेमी वाचकांच्या मनावर ठसवले आहे. ज्योती ग्रंथ वार्ता हे मासिक बुलेटिन गेले वर्षभर त्यांनी चालवले आहे. शिवाय आठवड्याला लेखक तुमच्या भेटीला हा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला असून त्यात अनेक नामवंतांना निमंत्रित केले आहे. [ज्योती स्टोअर्स, ४२ मेनरोड, नाशिक १. फोन (०२५३) ५०४०२६]

# निवेदन

**सर्व मराठी प्रकाशकांचा अद्ययावत कोश**

१८०५ साली देवनागरी लिपी वापरून छापलेलं पहिलं मराठी पुस्तक-विल्यम कॅरेचे 'दि ग्रामर ऑफ द मराठा लँग्वेज' हे बंगालमध्ये श्रीरामपूर येथे प्रकाशित झाले. आता २००५ साली मराठी ग्रंथ प्रकाशनाला २०० वर्षे पूर्ण होत आहेत. या दोन शतकात शेकडो व्यक्तींनी मराठी ग्रंथप्रकाशनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केलेले आहे. यातील काही लोक काळाच्या ओघात विस्मृतीत गेले आहेत. कित्येक प्रकाशकांच्या पुढील पिढ्या ह्या क्षेत्रात कार्यरत न झाल्यामुळे, अगर अन्य कारणांनी त्यांच्या प्रकाशन संस्थाही अस्तित्वात नाहीत. या सर्व ज्ञात-अज्ञात, विस्मृत त्याचप्रमाणे आज कार्यरत- अशा सर्व प्रकाशकांची तपशीलवार माहिती संकलित करण्याचे काम अ. भा. मराठी प्रकाशक संघातर्फे सुरू झाले आहे.

सध्या प्रकाशन क्षेत्रात कार्यरत असलेल्यांना, व आज कार्यरत नसलेल्या प्रकाशकांच्या परिचित, स्नेही, वंशज अशा सर्व संबंधितांना व मराठी ग्रंथप्रकाशनाबद्दल आस्था असलेल्या सर्वांना आम्ही त्यांना असलेली माहिती प्रकाशक संघास उपलब्ध करून द्यावी असे आवाहन करत आहोत.

१. प्रचलित प्रकाशक/प्रकाशन संस्था यांनी आपला नाव व पत्ता कळवावा. त्यांनी एक सविस्तर प्रश्नावली पाठवून त्यांची अधिक माहिती घेतली जाईल.

२. आज अस्तित्वात नसलेल्या प्रकाशनांची/प्रकाशन संस्थांची उपलब्ध माहिती संबंधितांनी कळवावी. त्यांच्याबद्दल पूर्वी कोठे लेख/माहिती प्रसिद्ध झाली असल्यास त्याबद्दल तपशील कळवावा.

**अध्यक्ष, शरद गोगटे, अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ,**

द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस, १२०० सदाशिव पेठ, लिमयेवाडी, पुणे ४११ ०३०



# श्रद्धांजली

**प्रसिद्ध कादंबरीकार चिंतामणी लागू**

प्रसिद्ध कादंबरीकार चिंतामणी लागू (वय ६१) यांचे दि. ४ ऑगस्टला हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा सून असा परिवार आहे.

श्री. लागू १९५६ ते ६७ या कालावधी नौदलात नोकरीला होते. तेथील सेवानिवृत्तीनंतर १९७७ पर्यंत त्यांचा अनेकविध व्यवसायांशी संबंध आला. त्यांना वाचनाची व लेखनाची मोठी आवड होती. त्यातूनच त्यांनी १९७८ पासून संपूर्ण वेळ व्यावसायिक लेखनास प्रारंभ केला. त्यात सामाजिक, राजकीय; तसेचे गुन्हेगारी, रहस्य या विषयांचा समावेश होता. त्यांच्या शंभराहून अधिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांतील 'क्रांती', 'जल्लार', 'मृत्यूचे पंख', 'पाठलाग', 'सागरपुत्र', 'अगम्य', 'अमृताचा प्याला' इ. कादंबऱ्या अतिशय लोकप्रिय ठरल्या.

लागू यांना अलीकडेच पक्षाघाताचा विकार झाला होता. त्यामुळे त्यांचे लेखन जवळपास थांबले. मात्र प्रकृतिअस्वास्थ्यावर मात करून ते निवडक साहित्यिक कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहत.

**ज्येष्ठ पत्रकार बापूराव लेले**

ज्येष्ठ पत्रकार नारायण बाळकृष्ण ऊर्फ बापूराव लेले (वय ८३) यांचे ११ ऑगस्ट रोजी जळगाव येथे निधन झाले. ते अविवाहित होते. त्यांच्या निधनाने पन्नास वर्षांतील राष्ट्रीय पातळीवरील पत्रकारितेचा एक चालताबोलता दुवा निखळला आहे. काही काळ मुंबईत आणि नंतर सलग पन्नास वर्षे दिल्लीत पत्रकारिता करून त्यांनी या क्षेत्रात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. खानदेशात मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेऊन त्यांनी मुंबईत अर्थशास्त्राची पदवी घेतली. संघाचे प्रचारक म्हणून काम केले. १९४९ मध्ये 'हिंदुस्थान समाचार' वृत्तसंस्थेचे संस्थापक सदस्य म्हणून ते दिल्लीला गेले. दिल्लीत राजकीय घडामोडींवर तसेच मोठमोठ्या व्यक्तींच्या संपर्कात राहून त्यांनी विपुल लिखाण केले. 'नारायण' या नावाने पुणे आणि नागपूरच्या 'तरुण भारत'मधून ते प्रसिद्ध झाले आहे. 'साधना', 'किर्लोस्कर' मधूनही त्यांनी लेखन केले.

यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री असताना त्यांच्या परवानगीने सीमेवरचे वृत्तांत मिळवून त्यांनी ते प्रसिद्ध केले. ताश्कंद करारासाठी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्यासमवेत

गेलेल्या पत्रकारांत त्यांचा समावेश होता. पत्रकारिता आणि स्वयंसेवक अशा दोन्ही भूमिकांत वावरताना त्यांनी मोठा लोकसंग्रह केला. दिल्ली साहित्य अकादमी पुरस्कार आणि शारदा ज्ञानपीठाचा सप्तर्षी पुरस्कार त्यांना मिळाला होता. ‘गुणसागर डॉ. हेगडेवार’ आणि पत्रकारितेवरील ‘स्मरणगाठ’ हे त्यांचे पुस्तक अलीकडेच प्रसिद्ध झाले. उच्चपदस्थांशी निकटचा परिचय असूनही, अखेरपर्यंत प्रसिद्धीपासून दूर राहून साधेपणानेच जगले.

**डॉ. शरदिनी डहाणूकर**

आधुनिक वैद्यक शास्त्रात नैपुण्य मिळवूनही आयुर्वेद संशोधन आणि उपचाराला रुग्णालयांमध्ये उचित स्थान देण्यासाठी झटणाऱ्या ज्येष्ठ चिकित्सक व नायर रुग्णालयाच्या अधिष्ठात्या डॉ. शरदिनी डहाणूकर यांचे ४ ऑगस्ट २००२ रोजी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये निधन झाले, त्या ५६ वर्षांच्या होत्या.

गेल्या काही दिवसांपासून डॉ. डहाणूकर मधुमेह व काविळीने आजारी होत्या.

डॉ. डहाणूकर यांनी फार्माकॉलॉजीमध्ये एमडी व पीएचडी केले होते. केईएम रुग्णालयात अध्यापन व सेवा करताना त्यांनी आयुर्वेद व वनस्पतीशास्त्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी वनौषधी व आयुर्वेदाबद्दल विपुल लेखनही केले. आयुर्वेदाबद्दल अधिक संशोधन करण्यांची ओढ जागृत झाली. तेव्हापासून १० वर्षे त्यांनी अथक संशोधन केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच केईएममध्ये आयुर्वेदाला ॲलोपथीच्या जोडीने रोगनिदान व उपचारात स्थान मिळाले.

केईएममध्ये १९८९ साली आयुर्वेद संशोधन केंद्रही सुरू झाले. त्यांनी स्वत: गुळवेल या वनस्पतीवर केलेले संशोधन उल्लेखनीय ठरले. वनौषधी हा त्यांचा खास अभ्यासाचा विषय होता. आयुर्विद्यावर्धिनी या ट्रस्टद्वारे त्या आयुर्वेद उपचार कार्य करीत.

वृक्षगान, मनस्विनीचे मणी, फुलवा, सगेसांगाती, हिरवाई, पांचालीची थाळी, स्वास्थ्यवृत्त आदी ग्रंथसंपदा त्यांच्या लेखणीतून उतरली. वृक्षवेलींमध्ये रमणाऱ्या डॉ. डहाणूकर पईधुंगट यांच्या कुटुंबात जन्मल्या. या गोमंतकन्येचा गोवा अकादमी तसेच इतर संस्थांनी विशेष गौरव केला.

आयुर्वेदाच्या गाढ्या अभ्यासक म्हणून डॉ. डहाणूकर परिचित होत्या. त्यांना विद्यार्थ्यांविषयी फार कळकळ होती. आयुर्वेदातील अनेक चांगल्या गोष्टी आधुनिक वैद्यकात आणण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. डहाणूकर यांनी केले.



**पुस्तक परिचय**

# व्हॉट वेंट रॉंग ?

## किरण बेदी




**अडचणीत सापडलेल्या स्त्री-पुरुष व्यक्तींची हृदयस्पर्शी मनोगते**

‘आय डेअर’ या किरण बेदी यांच्या चरित्रकहाणीने अनेक वाचक भारावून गेले. ‘इटस् ऑलवेज पॉसीबल’ या तिहार जेलच्या कायापालटाच्या अभूतपूर्व आत्मकथनालाही मराठी वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

आता त्यांचे ‘व्हॉट वेन्ट रॉंग’ हे नवे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध झाले आहे.

किरण बेदी यांनी ‘नवज्योती’ (स्थापना - १९८८) आणि ‘इंडिया व्हिजन फाउंडेशन’ (स्थापना - १९९४) अशा दोन स्वयंसेवी संस्थांद्वारे झोपडपट्टीतील मुलांना प्राथमिक शिक्षण आणि महिलांना प्रौढ शिक्षण व व्यवसाय शिक्षण देण्याचा उपक्रम गेली अनेक वर्षे राबविला आहे. व्यसनमुक्ती केंद्रे चालवून व्यसनाधीन व्यक्तींना पुनर्जीवनाची संधीही दिली आहे. मादक द्रव्यांच्या आहारी गेलेल्यांना व्यसनमुक्त करून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या कामाचा गौरव या वर्षीचे संयुक्त राष्ट्रसंघाने ‘सर्ज सॉट्रॉफ मेमोरियल ॲवार्ड’ देऊन केला आहे. यापूर्वीही त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार, जोसेफ ब्यूज पुरस्कार (जर्मनी), मॉरिसन-ट्राम निटकॉफ पुरस्कार(अमेरिका), गुड टेम्पलर्स ड्रग प्रिव्हेन्शन अँड कंट्रोल पुरस्कार (नॉर्वे) वगैरे पुरस्कार मिळालेले आहेत.

गुन्हेगारी व गुन्हेगारीचे दूरगामी परिणाम यांचे अध्ययन-निरीक्षण हे एक पोलिस अधिकारी करीतच असतो, परंतु संवेदनाशील मत असेल तर या निरीक्षणाला मानवतावादाची किनार लाभते आणि गुन्हेगारीपेक्षाही गुन्हेगाराच्या आड दडलेल्या माणसाचा शोध घेण्याची प्रेरणा बलवत्तर राहते. सर्वसामान्य माणूस सहजासहजी गुन्हा करायला प्रवृत्त होत नाही. तो करणे त्याला भाग पडते. गुन्हा करण्याइतपत परिस्थितीचा रेटा जाणवतो तेव्हा तो असहाय असतो. अनेकदा आपण जे करतो आहोत ते कृत्य कायद्याच्या दृष्टीने गुन्हा ठरू शकेल याची कल्पनाही नसते. अजाणतेपणी काहीतरी घडून गेलेले असते आणि त्यासाठी पोलिसांच्या वा न्यायालयाच्या तावडीत जावे लागते. नवज्योती व्यसनमुक्ती केंद्राचे काम सुरू झाल्यावर मूळचंदची केस आरंभी हाताळावी लागली आणि त्यातून एका नव्या समाजोपयागी कामाला चालना मिळाली. पुढे वेगवेगळ्या व्यक्तींच्या केसेस येत गेल्या आणि त्यातून समाजजीवनातील अनेक अनिष्ट गोष्टींकडे लक्ष जाऊ लागले. डॉ. किरण बेदी यांनी आपल्याकडे आलेल्या व्यक्तींच्या दु:खभरल्या कहाण्या लक्षपूर्वक ऐकल्या आणि त्या लिहून

घेतल्या. टाइम्स ऑफ इंडियामध्ये त्या आत्मनिवेदनांना लेखरूपाने प्रसिद्धी मिळाली. अशा ३७ कहाण्यांचा संग्रह 'व्हॉट वेन्ट रॉंग' या पुस्तकात करण्यात आला आहे.

या पुस्तकात ज्या कहाण्या आल्या आहेत त्या आतड्याला पीळ पाडणाऱ्या आहेत. त्यात अनेक घातपात अपघात आहेत. दुर्दैवाचे आघात आहेत. मानवी स्वभावप्रवृत्तीचे सैतानी आविष्कार आहेत. असहाय्य तारुण्याचे करुण दाहक वास्तव आहे.

यातील पहिली कहाणी आहे एका अफसानाची. वय २९, दोन मुलांची आई. १९ वर्षे वय असताना ती वडिलांना भेटण्यासाठी दिल्लीला येते. बसस्टँडवर उतरते. वडिलांकडे नेण्याऐवजी रिक्षावाला तिला आपल्या घरी नेतो व तिच्यावर बलात्कार करतो. ती त्यामुळे हादरते आणि 'आत्ताच्या आता माझ्याशी लग्न कर' असा हट्ट धरून बसते. तेव्हा तो मुसलमान असल्याचे तिला कळते. ती असते हिंदू. मग तिचे नाव बदलून अफसाना ठेवले जाते... पुढे वडील तिला शोधून त्या घरी येतात. तेव्हा ती एका मुलाची आई असते. 'तू आमच्या तोंडाला काळं फासलंस' असं म्हणून वडील निघून जातात. नवरा रियाझ हा बाहेरख्याली आहे, त्याची लफडी चालूच असतात. पण ती आपल्या दोन मुलांकडे पाहत त्या रिक्षावाल्याबरोबर राहते आहे. 'माझी मुलं हेच माझं जीवन सर्वस्व आहे. माझ्या जगण्याचा तोच आधार आहे.' मला जे भोगावं लागलं ते माझ्या मुलांना भोगावं लागू नये' अशी तिची भावना आहे.

शालिनीचे लग्न एका धनाढ्य तरुणाशी ठरलेय हे कळल्यावर तिच्या शेजारचा एक तरुण कुंदन तिच्यावर ॲसिड फेकून तिचा चेहरा विद्रूप करतो. अतिदक्षता विभागात तिला ठेवण्यात येते. स्किन ग्राफ्टिंग होते. पण तिची दृष्टी जाते. सात वर्षांनंतरही तिच्यावर उपचार चालू आहेत. त्यांचा खर्च भागविण्यासाठी तिच्या वडिलांना आपली जमीन विकावी लागली. तिच्याशी ज्याचे लग्न ठरले होते त्याने लग्नाला नकार देऊन दुसऱ्या मुलीशी लग्न केले. कुंदन अजूनही तिला धमक्या देत असतो, 'तुझ्या बहिणीचंही असं करीन', तिची केस अजून चालू आहे. कुंदनचे पाठीराखे पोलिस शालिनीला अजूनही सतावत आहेत.

मद्यपान व चरस यांच्या आहारी गेलेल्या मूळचंदने वडिलांच्या किराणा दुकानातून शक्य तेवढी उचल केली. ते पैसे संपल्यावर खिसेकापूचा पेशा पत्करला. पोलिसांनी पकडले. सहा महिन्यांची शिक्षा झाली. सुटून आल्यावर आईने लग्न लावून दिले. पण व्यसनामुळे पत्नीचे त्याच्याशी जमेना. ती त्याला सोडून गेली. आईने एका उपचार केंद्रात त्याला दाखल करून म्हटले, "आता मर इथेच. इथून जिवंतपणी बाहेर पडू नकोस." आजही तो व्यसनमुक्ती केंद्रात परिचारक म्हणून काम करीत आहे.

यापैकी बऱ्याच कहाण्यांमधून पोलिसांचे जे चित्र उभे राहते ते भयानक आहे. माणुसकीला काळे फासणारे आहे. मढ्याच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या वृत्तीचे निदर्शक आहे.

पोलिस चौकशीच्या निमित्ताने घरी येतात आणि घरातील मौल्यवान चीजवस्तू घेऊन जातात. पोलिस खुनाचा ठपका ठेवून वीस हजार रुपयांची लाच मागतात. (१७) ॲसिड फेकणाऱ्या रणजित व कुंदन यांची बाजू घेऊन तू खोटारडा आहेस असे सांगून जबरदस्तीने वेगळीच फिर्याद पोलिस लिहून घेतात. (७), रोज दोनतीन गुन्हे करणारा नक्षलवादी दरोडेखोर जयपालसिंग म्हणतो, "पोलिस अधिकाऱ्यांच्या व स्थानिक पुढाऱ्यांच्या मदतीशिवाय हे असले उद्योग करणे शक्यच नसते. असे बेइमान लोक पाठीशी असल्याशिवाय एखाद्या भागात आपला दरारा प्रस्थापित करता



येत नाही." (२४), "यातलं काहीही बोललीस तर परिणाम फार वाईट होतील" अशा धमक्या पोलिसच हुंड्यासाठी छळ होणाऱ्या ज्योतीला देतात. (३०), पोलिसांनी मला हद्दपार करण्याची धमकी दिली. रात्री घरी येऊन माझ्या तोंडातून व गुदद्वारातून एक बांबू आत खुपसला. माझ्या घोट्यावर वार करून माझा पाय मोडला. मी अक्षरश: उद्ध्वस्त झालो" हे एका सत्तर वर्षाच्या पीटर कॅम्प्यू या जर्मन गृहस्थाचे अनुभव (४१), पोलिस अधिकारी ड्युटीवर दारू पिऊन येतात. बेजबाबदारपणे वागतात. भ्रष्टाचारी व अनैतिक मार्गाचा अवलंब करतात असेही हा जर्मन म्हणतो. (४२), पोलिस अधिकाऱ्याने चौकशीत काहीच न आढळल्यावरही माझ्याकडे एक लाख रुपयांची मागणी केली, असे मेरीचे म्हणणे आहे. (५१), पोलिस प्रशिक्षकाला दारूची बाटली पुरवून मी त्याच्याकडून पाहिजे ती कामे करून घेऊ लागलो, अशा प्रकाराची कबुली आहे. (६१), मी गुन्हे करीत उघड उघड हिंडतो, मी व्यसनाधीन आहे पण पोलिसांनी मला आजवर कधीही पकडलेलं नाही. मी खरोखरच निरपराधी होतो तेव्हा मात्र याच पोलिसांनी मला पकडून शिक्षा केली होती, अशी दारूच्या व मादक द्रव्यांच्या आहारी गेलेल्या विजयची कैफियत आहे. (७६), माझे वडील निरपराध असूनही पोलिसांच्या तावडीत सापडले. रोजच्या रोजच पोलिसांची काही ना काही तरी मागणी असायची. वेगवेगळ्या खटल्यांमध्ये विनाकारण गुंतवण्याची धमकी देऊन ते माझ्या वडिलांकडून पैसे उकळत, असे पप्पूचे गाऱ्हाणे आहे. (११३)

या पुस्तकातील सर्वच कहाण्यांमधून पोलिसांची ही जी प्रतिमा अभावितपणे प्रकट झालेली आहे, आणि ती स्पृहणीय नाही. स्वत: किरण बेदी या पोलिस खात्यात उच्चपदस्थ असूनही या कहाण्यांमधील पोलिसांच्या वर्तनाबद्दलचे उल्लेख त्यांनी कायम ठेवले आहेत हे विशेष !

या कहाण्यांमधून समाजातले अनेक प्रश्न समोर येतात. दारिद्र्यामुळे अनेक तरुणांना गुन्हेगारीकडे वळणे क्रमप्राप्त ठरते. मुलींना वाममार्गाला लावण्यासाठी जागोजाग टोळ्या कार्यरत असतात. बलात्कार व व्यभिचार या घटनाही अनेकांची जीवने उद्ध्वस्त करतात. व्यसनी नवरा आयुष्यात आला तर सगळ्या संसाराची धूळधाण होते. सासरचे लोक छळवादी व स्वार्थी निघाले तरी जिणे क्लेशकारक होते. काहीवेळा सासरा व दीर हेच वासनेने वखवखलेले निघतात आणि आपल्या वासनापूर्तीसाठी सुनेचा व भाभीचा वापर करतात.

किरण बेदी यांनी या प्रत्येक मनोगताच्या अखेरीला 'कुठं चुकलं' अशी चौकट देऊन काही निरीक्षणे नोंदवली आहेत. ती लक्षात घेण्यासारखी आहेत. त्या व्यक्तीच्या जीवनातल्या चुका टळता आल्या असत्या तर अनेक अनर्थ टळले असते. तसेच सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, वैवाहिक प्रश्नही एकेकाचे जीवन बरबाद करण्यास कारणीभूत होतात. कायदा व न्यायव्यवस्था, पोलिस व भ्रष्टाचार यामुळेही प्रश्न गुंतागुंतीचे होतात.

**कुठं चुकलं ? मधील काही निरीक्षणे पहा.**

* पाशवी वृत्तीचे स्त्रीपुरुष आपल्या मुलांना विक्रीची वस्तू मानतात (१६४)
* जागा व पाणी यांच्या टंचाईमुळे झोपडपट्टीत ताणतणाव व भांडणे उद्भवतात.
* गुंडांशी कडकपणे वागण्याऐवजी पोलिस उगीचच मधस्थी करतात. त्यातून गुंडगिरी वाढते व सज्जनांचा छळ होतो. (१६८)
* जुगार व मद्यपान या मिश्रणातून घरातील स्त्रियांवर अनन्वित अन्याय होतात. (१६०)
* ब्लकमेल व धमकी हाच विवाहाचा पाया असेल तर तो विवाह यशस्वी होणे अशक्यच ! त्यामुळे आयुष्य यातनामय होणेच अटळ.

* भीती आणि दारिद्र्य यामुळे स्त्रीचे आयुष्य शापित ठरते. (१५६)
* पशुतुल्य माणसे लहान मुलांना प्यादी म्हणून वापरतात (१५६)
* ज्या मुलांना भरपूर वेळ असतो ती गुन्हेगारीच्या शाळेत शिकतात (१४४)
* पालकांच्या बेजबाबदार व बेबंद वागण्याची शिक्षा मुलांना व समाजाला होते (१४४)
* सामाजिक समस्या दूर करण्यासाठी सरकारी यंत्रणांकडे कुठल्याही योजना दिसत नाहीत (१४०)
* गरिबीला कंटाळून अनेक ग्रामीण तरूण गुन्हेगारीकडे वळतात व अडचणीत येतात.
* उदासीन पोलिसांची माणुसकीशून्य वागणूक अनर्थकारक ठरते (१३१)
* दहशतवादामुळे अनेक कुटुंबे देशोधडीला लागतात (१३१)
* गरिबी व बेकारी यामुळे माणसांची पिळवणूक करणाऱ्यांचे फावते. (१२५)
* असहिष्णू व क्रूर सावत्र आईमुळे अनेक मुले घर सोडून पळ काढतात (१११)
* आई वडिलांपैकी कोणी दुसरं लग्न केलं तर मुलांना त्यांची किंमत कधी न कधी मोजावी लागते (१११)
* शिक्षण व साक्षरता यांच्या अभावी मुलींची पिळवणूक होते. (१११)
* दीर्घकालीन न्यायालयीन प्रक्रियेमुळे गरीब कुटुंबांचे भयंकर शोषण होते. (१०६)
* गरीब व अशिक्षित लोकांशी पोलिसांचे वागणे अशिष्ट व अन्यायकारक असते. (१०६)
* न्यायदेवता आंधळीच नव्हे तर लाकडी ठोकळ्यासारखी अचेतनही आढळते (१०१)
* आई वडिलांपैकी कोणी अनैतिक संबंध ठेवणारे असेल तर ते बघून मुलांच्या मनावर घातक परिणाम होतो (९६)
* अशा कुटुंबात भांडणे व ताणतणाव जास्त दिसतात (९६)
* शिक्षणाचा अभाव हा शाप ठरतो (९१)
* मुलांशी सुसंवाद साधण्याऐवजी त्यांना मारहाण करणारे पालक त्या मुलाच्या मनात विद्रोहाची बीजे पेरतात (७७)
* पोलिसांच्या उद्दामपणा विरुद्ध जनता आवाज उठवत नाही. हे चूक आहे. (४३)
* सत्ताधारी लोक कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन स्वार्थ साधनात (२६)
* सरकारी रुग्णालयातील डॉक्टर्सचा हलगर्जीपणा अनेकांची जीवने उद्ध्वस्त करतो (९)

डॉ. किरण बेदी यांनी ड्रग ॲब्युज ॲंड डोमेस्टिक व्हायोलन्स या विषयावर पीएच. डी. केली आहे. त्या अभ्यासामुळे मादक द्रव्यांचे सेवन आणि घरात मुलांचा व महिलांचा होणारा छळ याबाबत त्यांच्या संवेदना तीव्र आहेत. या सर्व सत्य घटनांतूनही त्याची प्रचीती येते.

या सर्व कहाण्या वाचून मन विषण्ण होते. सात वर्षाच्या निरपराध मुलाला जेव्हा चोरीच्या आरोपावरून बालसुधार गृहात पाठवले जाते, तेव्हा त्याचे भावी आयुष्य सर्वसामान्य व्यक्तींसारखे जाईल ही अपेक्षा करणेही व्यर्थच ठरते. ऐन तरूण वयात बलात्कार-अत्याचार होणारी तरुणी आयुष्यात निर्भयपणे जगू शकण्याची अपेक्षा करणेही गैरच ठरते. हे पुस्तक आपल्या बधिर संवेदनांना जाग आणणारे ठरायला हवे. १३ हजारावर तरुणांना नवज्योतीने व्यसनमुक्त केले आणि अडचणीतील शेकडो महिलांना पुनर्वसनासाठी मदत पुरवली आहे. त्यामुळे आपल्याला नवी दिशी गवसू शकेल.

**पृष्ठे : १८४ किंमत : १५०रु. सभासदांना :११३रु. पोस्टेज :२०रु.**



## शरदबाबूंच्या लेखणीतून साकारलेली एक अजरामर प्रेमकहाणी

# देवदास

**शरच्चंद्र चट्टोपाध्याय**

**अनु. मृणालिनी गडकरी**



देवदास या चित्रपटाने सध्या उत्पन्नाचे उच्चांक प्रस्थापित करून सर्वांना चकित केले आहे. शरच्चंद्र चॅटर्जी यांनी १९१० मध्ये लिहिलेल्या आणि १९१७ साली प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीवर आजवर वेगवेगळ्या भाषांत आठ चित्रपट निघाले. हिंदीत सैगल आणि दिलीपकुमार यांनी मुख्य भूमिका केलेले दोन चित्रपट पीसी बरूआ आणि बिमल रॉय यांनी अनुक्रमे १९३५ आणि १९५५ मध्ये काढले. त्यात अनुक्रमे सैगल व दिलीप कुमार यांच्या भूमिका होत्या. त्यानंतर आता शाहरूख खानची भूमिका असलेला चित्रपट संजय लीला भन्साळी यांनी काढला आहे. पन्नास कोटीच्या घरात खर्च करून काढण्यात आलेल्या या नव्या देवदासमधील सेट्सची भव्यता नेत्रदीपक असली तरी मूळ कथेचा गाभा तिच्यातून गायब झाला आहे, आत्मा गमावलेला आहे, अशी टीका त्यावर होत आहे. शरच्चंद्रांच्या 'देवदास'मध्ये काही लहानमोठे बदल केले गेले आहेत, त्याबद्दलही चर्चा होत आहे. ज्यांनी सैगलचा वा दिलीपकुमारचा देवदास बघितलेला नाही त्यांना शाहरूखखानचा देवदास ही झपाटून टाकतो आहे असेही दिसते. एकूण देवदासची ही जी लोकप्रियता आहे ती मूळ कादंबरीची आवाहकता प्रकट करते - हे मान्य करायलाच हवे.

देवदास ही तशी अवघी शंभर पृष्ठांची छोटीशी कादंबरी आहे. परंतु अनेक भारतीय भाषांमध्ये तिचा अनुवाद झालेला आहे. आणि आपल्या प्रेयसीशी लग्न करण्याचे धाडस न दाखवता आल्याने इतरत्र सुखाचा शोध घेणारा परंतु मूळच्या प्रेयसीच्या व प्रेमाचा विसर न पडणारा आणि त्याच दु:खात अखेर भग्नमनस्क होऊन शोकांतिक वाटचाल करणारा एक मनस्वी प्रियकर म्हणजे देवदास- अशी त्याची प्रतिमा भारतीय जनमानसात स्थिरावली आहे. मृत्यू समोर येऊन उभा ठाकल्यावर देवदास जीवाच्या आकान्ताने आपल्या विवाहित प्रेयसीच्या गावी येतो आणि तेथेच एका पारावर त्याला मृत्यू येतो हा चटका लावणारा शेवट आजही सहृदय वाचक-प्रेक्षकाला सैरभैर करून सोडतो. शरदबाबूंच्या अगदी आरंभीच्या लेखनापैकी ही कादंबरी आहे. परंतु तिच्यातही त्यांच्या जबरदस्त लेखणीची व प्रतिभेची ताकद दिसते. आवारा मसीहा या त्यांच्यावरील चरित्रात्मक पुस्तकात देवदासच्या प्रकाशनाची हकीकत देण्यात आली आहे. शरदबाबूंनी आपल्या मित्राला हे हस्तलिखित लिहून झाल्यावर सात वर्षांनी दिले. कोणालाही न दाखवता व जाळून टाकण्यास

सांगितले. त्या मित्राने ते वाचले आणि सरळ एका मासिकाच्या संपादकाकडे दिले. क्रमश: चार अंकात त्याने ते छापले. पहिल्या अंकातील आरंभीच्या भागानेच वाचकांना झपाटून टाकले, आणि पुढच्या अंकासाठी त्या मासिकाच्या कार्यालयापुढे रांगा लागू लागल्या. देवदास, पार्वती आणि चंद्रमुखी या त्रिकोणाने जणू त्यावेळच्या तरुणवर्गाच्या मानसिक कोंडीलाच वाचा फोडली. प्रेमभावना प्रकट करण्यातील त्यावेळच्या संकोच आणि सरंजामी समाज जीवनातील श्रेष्ठकनिष्ठपणाच्या कल्पनांचा पगडा यामुळे आपल्या स्वाभाविक उर्मीही दडपण्याचा तो काळ होता आणि त्याचे यथार्थ प्रतिबिंब शरदबाबूंच्या 'देवदास'मध्ये जाणवत होते. शरदबाबूंच्या इतर कादंबऱ्यांमध्येही तत्कालीन समाजाचे अत्यंत वास्तव चित्रण झालेले आहे. परंतु देवदासचे व शरदबाबूंच्या श्रीकान्त वगैरे नायकांचे व राजलक्ष्मी, कमल, बिराजबहू वगैरे नायिकांचे जे वेगळेपण आहे ते अनेकविध आहे.

प्रा. नरहर कुरुंदकर यांनी शरदबाबूंच्या कादंबऱ्याच्या संदर्भात अनेक मार्मिक विधाने केलेली आहेत.

* जातिव्यवस्थेने जखडलेला हिंदुसमाज हा शरच्चंद्रांचा विषयच नाही. त्यांच्या कादंबरीत ज्या दु:खाचे आणि व्यथेचे चित्रण आहे ती व्यथा सुसंस्कृत माणूसजातीला मूलभूत आणि प्रकृतिसिद्ध असणारी व्यथा आहे. या दु:खाचे स्वरूप सांस्कृतिक व स्वयंभू आहे.

* परंपरेला जे अमान्य आहे ते आपल्याला हवे आहे म्हणून शरच्चंद्रांच्या कादंबरीतील माणसे दु:खी झालेली नाहीत, तर त्यांचे दु:ख जे त्यांना हवे आहे त्यातूनच निर्माण झालेले आहे; म्हणून या कादंबरीत दु:ख भोगताना माणसे आपले माणूसपण विकसित करू लागतात. हे माणूसपण त्यांच्या जीवनातील मानसिक उंचीवर आणि जीवनात प्रमाण मानलेल्या मूल्यांवर आधारलेले असते.

* अत्यंत वेदनामय असा स्वत:च्याच दु:खाचा शोध हे शरदबाबूंच्या कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. म्हणून या वाङ्मयाला बोधाचे अस्तर किंवा रंजनाचे असे काही बाह्य प्रयोजनच नाही.

* शरदबाबूंनी जणू व्यक्तींच्या प्रतिष्ठेची कल्पनाच आपल्या सर्व साहित्यात मांडली आहे. आपली पात्रे त्यांना वंदनीय, आदरणीय करून दाखवायची आहेत.

* सर्व समाजातील सर्व दलितांना वंदनीय करणारा, त्यांना आदराची जोड देणारा शरच्चंद्र हा एक विरळा कलाकार होता. ही आदराची जोड त्यांनी त्यामागील माणूस दाखवून केली आहे. त्यांची जीवनमूल्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उजळवून टाकतात. उदात्त रूप दाखवतात.

* शरदबाबूंची वाङ्मयसृष्टी ही शोकाच्या ढगांनी व्यापलेली असली तरी त्यांच्या पात्रांना कधी पराभूत मनोवृत्तीचा स्पर्श होत नाही. ही पात्रे पराभूत होत नाहीत म्हणूनच ती दु:खी आहेत. ती पराभूत झाली की सुखी होतील. कारण ज्या वेदनांनी ती तडफडत असतात त्या वेदना त्यांच्यावर कुणी लादलेल्या नाहीत. त्यांनीच त्या आवाहन करून बोलवलेल्या आहेत. त्या क्लेशांनी त्यांची दिप्ती वाढते. म्हणून दु:खाविरुद्ध येथे तक्रार नाही. व्यथा लिप्तता निर्माण करीत नाही, तिथे व्यथेला माधुर्य आलेले आहे.

* शरच्चंद्रांची पात्रे परंपरेचे एक मूल्य सांभाळताना दुसरे मूल्य तोडतात, पण कमलचा अपवाद वगळता ती बंडखोर वाटत नाहीत.

* शरदबाबूंची कादंबरी जीवनाकडे पाहण्याचे मूल्यच बदलून टाकण्याचा प्रयत्न करणारी कादंबरी आहे. ती दृष्टिकोणच बदलू इच्छिते.

* त्यांच्या कादंबरीतील बंडखोरी ही माणसाच्या माणुसकीचे रक्षण करणारी असल्यामुळे ती बंडखोरी म्हणून जाणवतच नाही.



* शरदबाबूंची पात्रे ही पराभूत पात्रे नाहीत. ती बंडखोर आहेत. त्यांची बंडखोरी विशिष्ट मूल्यांचा स्वीकार करून उभी राहते, आणि हे मूल्य त्या पात्राच्या लेखी इतके महत्त्वाचे असते की दारिद्र्य, यातना, अप्रतिष्ठा किंबहुना मृत्यूच गौण होऊन जातो.

* ही कादंबरी शोकान्त होऊ शकत नाही तशी शोकात्मपण विसरू शकत नाही असे हिचे गूढ, मधुर, उदास आणि उत्साही स्वरूप आहे.

* आरंभापासून शरच्चंद्र काही महान व भव्य पात्रे निर्माण करण्याचा प्रयोग करीत आहेत; एक सव्यसाचीचा अपवाद वगळता त्यांची महान पात्रे जितकी महान वठविण्याची त्यांची इच्छा होती तितकी महान होऊ शकली नाहीत. ही पात्रे महान आहेत असे कादंबरीतील प्रत्येकजण सांगत असतो, पण त्यांची महत्ता आपल्याला कशी जाणवत नाही याचे वाचकांना आश्चर्य वाटते. ही पात्रे महान असल्यामुळे त्यांच्या मनात भावनाकल्लोळांना जागाच नाही. ही पात्रे मूल्य स्वीकार करूनच कादंबरीत येतात आणि मूल्यरक्षणार्थ आपले सर्वस्व खर्च करतात. मूल्यसंभ्रमामुळे निर्माण होणारा कल्लोळ त्यांच्यात दिसतच नाही.

देवदास प्रथम दिसतो तो बारा वर्षांचा शाळकरी मुलगा म्हणून. तालसोनापूरच्या गोविंद पंडितांच्या पाठशाळेत भोलानाथला चुन्याच्या ढिगाऱ्यावर ढकलून पसार होणारा, जमीनदार नारायण मुखोपाध्याय यांचा सुपुत्र देवदास आंबराईतल्या वेळूच्या बनातल्या आपल्या नेहमीच्या संकेतस्थळी जाऊन हुक्का ओढत बसतो. गोविंद पंडित आणि भोलानाथ दोघे जमीनदाराकडे जाऊन देवदासबद्दल तक्रार करतात. तर देवदासची आई अजून पोर भुकेला आहे म्हणून चिंता करीत राहते. पुरोहितगिरी करणाऱ्या नीळकंठ चक्रवर्तीची कन्या पार्वती, देवदासच्याच वाड्यातील मागील घरात राहते आणि त्याच्याच पाठशाळेत असते. भोलानाथच्या फजितीची हकीकत ती देवदासच्या नोकराला, धर्मदासला हसू दाबत दाबत सांगते आणि त्याला खाण्यासाठी काही पदार्थ घेऊन त्या वेळूबनातल्या 'गुप्त'जागी जाऊन त्याला गाठते... देवदास तिला पाणी आणायला सांगतो तर ती म्हणते, 'मी जाणार नाही. इथून मी गेले तर तू पळून जाशील.' तर देवदास तिचे केस खेचून तिच्या पाठीत गुद्दा मारतो. रडतरडत पार्वती देवदासच्या वडिलांकडे जाऊन सांगते, ''देवदासनं मला मारलं.'' आणि वेळूच्या बनात तो हुक्का ओढतोय हेही ती रागाच्या भरात उघड करते. ''मग मला आधी का सांगितलं नाहीस ?'' या प्रश्नावर ती उत्तर देते, ''देवदा मारील म्हणून'' पण आपल्या या मानसकन्येबद्दल वाचकांच्या मनात कुठलाही संभ्रम राहू नये म्हणून शरदबाबू लगेच म्हणतात, ''पण ते उत्तर बरोबर नव्हते. ही गोष्ट कळली तर देवदासला मार खावा लागेल या भीतीने ती आजवर बोलली नव्हती. रागाच्या भरात ती ही गोष्ट बोलून गेली. आठवं संपून नववं वर्ष लागलेली ही मुलगी; पण तिला काही कळत नव्हतं असं नाही. या वयात राग जरा जास्तच येतो. पण तिच्या लक्षात आपली चूक आली. घरी जाऊन ती अथंरुणावर पडली. हुंदके देत तशीच उपाशी झोपी गेली.''

दुसऱ्या दिवशी देवदासला बेदम मार खावा लागतो. तिसऱ्या दिवशी पारूला देवदासचा मार खावा लागतो. ती घरी जाऊन मास्तरनी मारले म्हणून सांगते तेव्हा तिची शाळा बंद होते. देवदासला घरी आल्यावर मार बसणार ही भीती असते, पण त्याची आई त्याला पार्वतीला मास्तरांनी मारले म्हणून तिला तिची आई यापुढे शाळेत पाठवणार नाही अशी बातमी देते, त्यामुळे आपला मार चुकला, पार्वतीने आपल्याला वाचविले म्हणून त्याला प्रेमाचे भरते येते. तो पार्वतीला भेटून सांगतो, ''पारू बरंच लागलं ग तुला...? तू असं का करतेस ? मग मला राग येतो आणि तुला

मार बसतो... पुन्हा असं करू नकोस... मी तुला कधी मारणार नाही. ''

पार्वतीच्या मनात येणारा प्रश्न 'मी असं केलं तरी काय ?' शरच्चंद्र वाचकांपुढे ठेवतात.

-आणि हा प्रारंभीचा प्रश्न अखेरपर्यंत तसाच पुन:पुन्हा वाचकांपुढे येत राहतो.

पार्वतीवर देवदासचे प्रेम आहे. देवदासला कलकत्ता येथे शिक्षणासाठी पाठवण्यात येते. पार्वतीची शाळा इकडे पुन्हा सुरू होते. देवदासला कलकत्त्याचे पाणी लागते. विलायती बूट, नीटनीटके कपडे, छडी., तो आता पूर्ण शहरी झाला होता.

पार्वतीचं वय तेरा झालं. तिच्या लग्नाच्या गोष्टी सुरू होतात. परंतु देवदासच्या वडिलांना आपल्याला जमीनदार घराणेच हवे असे वाटते. ''मुलामुलींची विक्री करणाऱ्या चक्रवर्ती घरातली मुलगी घरात कशी आणायची ? घराण्याचं हसू करून घ्यायचंय का ?''

तर पार्वतीच्या वडिलांची प्रतिक्रिया काय ? ते म्हणतात, ''मुलींच्या लग्नासाठी आम्हांला कोणाचे पाय धरावे लागत नाहीत. उलट लोकच आमचे पाय धरायला येतात. एका आठवड्यात मी मुलीचं लग्न ठरवीन.'' आणि ते वर्धमान जिल्ह्यातल्या हातीपोताच्या श्रीमंत जमीनदाराशी, भुवन चौधरीशी पार्वतीचं लग्न ठरवूनही टाकतात. त्या जमीनदाराची बायको वर्षापूर्वी वारलेली होती. म्हणून ते हे दुसरे लग्न करीत होते. वय चाळीसच्या आत...

देवदासला ही बातमी त्याची आई सांगते. ''पारूचं लग्न ठरलं. याच महिन्यात होईल. नवरामुलगा विधुर आहे. पण पैसाअडका भरपूर आहे. पारू सुखासमाधानात राहील.''

पार्वतीच्या लेखी देवदास हाच तिचा पती. ती रात्री त्याला भेटते. पण त्याची मन:स्थिती द्विधा असते. आईवडिलांचा विरोध, तशात त्यांचे घराणे कनिष्ठ. मुलीसाठी हुंडा घेणारे. वडिलांशी तो हा विषय काढतो. पण ते म्हणतात, ''तू मला लहानपणापासून फार त्रास देत आला आहेस. आणि मला मरेपर्यंत तू त्रासच देत राहणार आहेस हे नक्की.'' तेव्हा तो लगेच कलकत्त्याला जातो. तेथून पार्वतीला पत्र लिहून मला विसरण्याचा प्रयत्न कर असे कळवतो.

त्या पत्रातले एक वाक्य मोठेच चमत्कारिक असते. ''तुझ्यावर मी खूप प्रेम केलंय असं मला वाटत नाही. आजही तुझ्यासाठी मला खूप त्रास होतोय असं नाही. पण माझ्यामुळं तुला त्रास सोसावा लागणार आहे ह्याचं मात्र मला वाईट वाटतं.''

हे पत्र पोस्टात टाकल्यावर मात्र त्याच्या मनात खरी खळबळ माजते, आणि तो कॉलेज सोडून बाडबिस्तरा घेऊन गोवी परतण्याचे ठरवतो. मित्राला, चुनीलालला तो सांगतो, ''शिक्षण, विद्या, बुद्धी, ज्ञान, उन्नती - हे सगळं सुखासाठी असतं... स्वत:च्या सुखापुढं यांची काय किंमत ?... शिक्षणामुळं माझं खूपच नुकसान झालंय. मला ते आधी ठाऊक असतं तर मी कलकत्त्याचं तोंडही बघितलं नसतं.'' गावी आल्यावर तो पार्वतीला घाटावर भेटतो आणि म्हणतो, ''मी कसंही करून माझ्या आईबाबांचं मन वळवेन.'' इथं पार्वतीचा स्वाभिमान उफाळून येतो, ''तुला आईवडिल आहेत आणि मला नाहीत ? याचा विचार नको घ्यायला ? आईबाबांना माझं कल्याण व्हावं असंच वाटतं, म्हणून ते तुझ्यासारख्या अडाणी, लहरी, अविचारी माणसाच्या हातात माझा हात आता मुळीच देणार नाहीत. वाट सोड माझी.... हवं तर फास माझ्या तोंडाला काळं. कर माझी बदनामी...''

त्या अपमानाच्या तिरीमिरीत देवदास जवळच्या गळाचा फटका पार्वतीच्या कपाळावर मारतो. डाव्या भुवईपर्यंत जखम होते. रक्तबंबाळ होऊन ती खाली बसते. ''अखेर निरोप घेताना आठवणीसाठी एक खूण करून ठेवली. जखम लवकरच भरून येईल. पण वण राहील. असा सुंदर



चेहरा आरशात पाहशील ना ?''

पार्वती घरी जाऊन सांगते, ''घाटावर पाय घसरून पडले. दगड लागला डोक्याला.''

इकडे देवदास परत कलकत्त्याला जातो. चुनीलाल या प्रौढ मित्राकडे राहतो. त्याच्याबरोबर चंद्रमुखीच्या कोठीवर जातो. तिची त्याची पहिली सलामीच जगावेगळी होते. ''चुनीबाबू, कुठल्या भिकार जागी आणलंत मला ? शी ! काय हे असभ्य वागणं ! किती घाणेरडं दिसतंय... '' त्याचं हे सडेतोड बोलणं तिच्या काळजाला भिडतं. आजवर तिच्यावर कोणीच कधी मात केलेली नसते. असला विचित्र माणूस तिला कोणी भेटला नव्हता. ''पैसे घेतेस ना तू... घे.'' आणि तो ताडताड त्या कोठीखान्याच्या पायऱ्या उतरतो... चंद्रमुखी ते पैसे चुनीलालला परत देऊन म्हणते, ''हे बघा, तुम्हाला पटत असेत तर हे पैसे तुमच्या मित्राला परत देऊन टाका... ते त्याने मनापासून दिले नाहीत. मी पैसे घेते म्हणून रागाने देऊन गेला... माझ्यावर एक उपकार करा... एकदा त्याला पुन्हा माझ्याकडे घेऊन या. आणाल ना ?'' चुनीलाल तिच्याकडे बघतच राहतो.

या नात्यातलेही हृद्य असे अनेक पैलू शरदबाबू दाखवतात.

...चंद्रमुखीकडे देवदास येतजात राहतो, दारूच्या आहारी जातो पण तिला हे कळून चुकते की तो आपल्याकडे पाहत नाही, आपल्यात पार्वतीचेच रूप पाहतो आहे. शुद्धीवर असताना तो कधीही तिचा स्पर्श होऊ देत नाही.

पार्वती आपल्या जमीनदार नवऱ्याच्या घराची सूत्रे हाती घेते. सर्वांचा लोभ संपादन करते. (बिमल रॉय यांच्या चित्रपटात जरठ कुमारी विवाहाची कल्पना सुसह्य करण्यासाठी हा जमीनदार नवरा आपल्या वयातील फरक दाखवून लग्नाबद्दल क्षमा मागतो आणि मी तुला स्पर्शही करणार नाही असे तिला सांगतो. तर भन्साळींच्या नव्या देवदासमध्ये तो सांगतो, ''माझं माझ्या पहिल्या पत्नीवर अजूनही प्रेम आहे. तुझ्याकडं पाहतानाही मला तीच दिसते. त्यामुळं मी तुला कधी स्पर्श करणार नाही.'' कदाचित सद्य:कालीन प्रेक्षकांची मनोधारणा लक्षात घेऊन हा बदल केला गेला असेल. मूळ कादंबरीत भुवन चौधरी व त्यांच्या कुटुंबातील सर्वजण पार्वतीच्या व देवदासच्या मैत्रीबद्दल शेवटपर्यंत अनभिज्ञ असतात असे दाखवले आहेत. बिमल रॉयनीही तसेच दाखवले आहे. या नव्या चित्रपटात नवरा व सासू पार्वतीला देवदासवर तुझे प्रेम होते का असे विचारतात, तेव्हा ती अभिमानाने म्हणते, ''तुमचे तुमच्या पहिल्या पत्नीवर आजही प्रेम आहे. मग माझे असले तर तर त्यात जगावेगळे ते काय आहे ?'')

-देवदासने शेवटी पार्वतीच्या गावी येऊन पारावर बेवारशी म्हणून मरणे ही घटना कोणत्याही सहृदय वाचकाच्या अंत:करणाला पीळ पाडणारी आहे. आणि शरदबाबू शेवटी म्हणतात, ''तुम्ही कोणी ही कथा वाचलीत तर आमच्यासारखं तुम्हालाही दु:ख होईल. देवदाससारख्या दुर्दैवी, मद्यासक्त पाप्याबरोबर तुमची ओळख झाली तर त्याच्यासाठी प्रार्थना करा. त्याच्यासारखं मरण दुसऱ्या कोणाला येऊ नये, अशी प्रार्थना करा. मरणात हानी काही नाही, पण त्या वेळी एखादा प्रेमळ हात त्याच्या कपाळावर असावा, एखादा प्रेमळ चेहरा बघत असावा, कोणाच्या तरी डोळ्यांतील आसवे पाहता पाहता डोळे मिटावेत.''

आज नव्वद वर्षांनंतरही वाचक प्रेक्षकांना देवदासची वेदना अस्वस्थ करू शकते. हे तिच्या विश्वात्मकतेचे गमक आहे.

**पृष्ठे : ११६ किंमत : ९० रु. सभासदांना :६८ रु. पोस्टेज :२० रु.**

## लोकविलक्षण घटना आणि व्यक्ती यांच्या उत्कंठावर्धक कहाण्या

### टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट
### अनु. लीना सोहोनी




लॉर्ड जेफ्री आर्चर हा इंग्लंडमधला एक कोट्यधीश बेस्टसेलर लेखक. सध्या तो इंग्लंडमध्येच कारावासात आहे. तेथील पार्लमेंटचा काही काळ सदस्य असलेला आणि काँझर्वेटिव्ह पार्टीचे उपाध्यक्षपद भूषविलेला जेफ्री आर्चर लंडनच्या मेयरपदासाठीही उभा होता. पूर्वी कधीतरी त्याने एका वेश्येला दिलेल्या रकमा लपविण्यासाठी काही बनावट कागदपत्रे तयार केल्याच्या व खोटी साक्ष दिल्याच्या आरोपावरून चार वर्षांची सजा त्याला सुनावण्यात आली आणि ती सध्या तो भोगत आहे. १४ वर्षांपूर्वी न्यूज ऑफ दि वर्ल्ड, व डेली स्टार या वृत्तपत्रांवर जेफ्री आर्चरने बदनामीचा खटला भरला होता, कारण जेफ्री आर्चरचे एका वेश्येशी संबंध असल्याची बातमी या वृत्तपत्रांनी छापली होती. परंतु त्यासाठी डायरीत खोट्या नोंदी करून तो पुरावा सादर केल्याने जेफ्री आर्चरलाच शिक्षा झाली. त्या बदनामीच्या प्रकरणात समझोता करण्यासाठी जेफ्री आर्चरने न्यूज ऑफ दि वर्ल्डला ३ लाख ६२ हजार पौंड देण्याचे मान्य केले आहे. डेली स्टार या दुसऱ्या वृत्तपत्रानेही २८ लाख पौंड नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तिच्या बाबतीतही बोलणी चालू आहेत. जेफ्री आर्चरने डेली स्टारवर भरलेल्या अब्रुनुकसानीच्या खटल्यात प्रथम डेली स्टारला दोषी ठरवून जेफ्री आर्चरला पाच लाख पौंड नुकसान भरपाईही त्यावेळी मिळाली. पुढे न्यूज ऑफ दि वर्ल्डवरील खटल्यात जेफ्री आर्चरचा खोटेपणा उघड झाल्याने न्यूज स्टारने आपण भरलेली दंडाची रक्कम व्याजासह परत मिळावी असा खटला दाखल केला. आणि वर म्हटल्याप्रमाणे २८ लाख डॉलर्सची मागणी केली आहे. तडजोडीने हा खटला मिटवण्याचा जेफ्री आर्चरचा प्रयत्न आहे.

हे प्रकरण एखाद्या कादंबरीतील प्रकरणासारखेच नाट्यपूर्ण असले तरी जेफ्री आर्चरच्या कादंबऱ्यांच्या लोकप्रियतेत घट झालेली नाही. केन अँड एबल, ऑनर अमंग थीव्हज्, प्रेसिडेन्टस डॉटर वगैरे त्याच्या कादंबऱ्यांनी त्याला ६ कोटी पौंडांची कमाई करून दिलेली आहे असे म्हटले जाते. दिवाळखोर बनलेल्या जेफ्री आर्चरने काहीतरी उत्पनाचा मार्ग हवा म्हणून केन अँड एबल ही कादंबरी लिहिली; आणि आश्चर्य म्हणजे या कादंबरीने त्याला लाखो पौंड मिळवून दिले, आणि त्याची दिवाळखोरी संपुष्टात आली. तो पार्लमेंटचा सदस्य झाला. पक्षाचा उपाध्यक्ष झाला. बेस्ट सेलर लेखक म्हणून त्याच्या पुढच्या कांदबऱ्यांनाही उत्तम प्रतिसाद मिळत राहिला. एक उत्तम



कथाकथनकार म्हणून त्याची वाहवा होता. वाचकांना कथानकात गुंतवून ठेवण्याचे त्याचे सामर्थ्य आचाट आहे.

त्याच्या काही कादंबऱ्या मराठीतही आल्या आहेत.

नुकताच त्याचा 'टू कट ए लाँग स्टोरी शॉर्ट' हा कथासंग्रह मराठीत मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध झाला आहे. लीना सोहोनी यांनी हा अनुवाद केला आहे. हा त्याचा चौथा कथासंग्रह आहे.

या संग्रहात एकूण पंधरा कथा आहेत. त्यातील एक कथा तर फक्त अर्ध्या पृष्ठाची आहे. (डेथ स्पीक्स), दि लेटर (५ पृष्ठे), लव्ह अॅट फर्स्ट साईट (३ पृष्ठे), या दोन कथा तीन चार पृष्ठांमध्ये नाट्य फुलवतात. दि एन्डगेम (५० पृष्ठे), टू मेनी कोइन्सिडेन्सेस (४२ पृष्ठे), दि ग्रास इज ऑलवेज ग्रीनर (२२ पृष्ठे), अदर ब्लायटर्स एफर्टस (२२ पृष्ठे) या चार त्या मानाने दीर्घ कथा सोडल्या तर बाकीच्या सहा ते वीस पृष्ठांच्या दरम्यान आहेत. या कथांपैकी नऊ कथा सत्य घटनांवर आधारित आहेत, हे अनुक्रमणिकेत जाणीवपूर्वक नमूद करण्यात आले आहे. तशी खूण त्या कथांच्या नावामागे करण्यात आली आहे.

यातील पहिली कथा डेथ स्पीक्स ही मूळ अरबी कथा असून ती जेफ्री आर्चरला खूप आवडली, त्याच्या काळजाला स्पर्श करून गेली म्हणून या संग्रहात अग्रभागी देण्यात आली आहे. सॉमरसेट मॉमच्या शेप्पी या नाटकात व जॉन ओ'हाराच्या एका पुस्तकाच्या प्रस्तावनेतही ती आली आहे. एखादी कथा किती साध्या सोप्या शैलीत सांगता येऊ शकते याचे एक अप्रतिम उदाहरण म्हणून जेफ्री आर्चर या कथेचा गौरव करतो. कथाकथनाची देणगी ईश्वराने कोणताही पूर्वग्रह न बाळगता, त्यासाठी शिक्षण, संस्कार वगैरे काहीही पूर्व अट न घालता माणसाला दिली आहे असे मत बाळगणारा जेफ्री आर्चर उत्तम कथाकार म्हणून जोसेफ कॉनराड, वॉल्टर स्कॉट, जॉन बुखान, ओ. हेन्री, हॅन्स अँडरसन यांची नावे घेतो.

जेफ्री आर्चरला सर्वात जास्त आवडलेली अरबी कथा कोणती याची वाचकांना उत्सुकता वाटत असणारच, म्हणून ती संपूर्ण कथाच येथे देतो. अवघ्या पंधरासोळा ओळींची तर ती आहे, त्यामुळे फारशी जागा तिला लागणार नाही- म्हणून ती उद्धृत करणे सोपेही आहे.

*बगदाद शहरातल्या एका व्यापाऱ्याचा नोकर थरथर कापत बाजारातून येतो आणि म्हणतो, "मालक, बाजारात मला एका बाईचा धक्का लागला. मागे वळून बघितले तर ती बाई चक्क मृत्युदेवताच होती हे माझ्या ध्यानात आले. तिची नजर धमकीवजा इशारा देत होती जणू... मालक, मला तिच्यापासून दूर जायला हवे. तुमचा घोडा मला द्या. म्हणजे मी हे गाव सोडून सामारा गावी जाऊन राहीन म्हणतो. तिच्या तावडीतून सुटण्याचा तोच एक मार्ग दिसतो. तिच्या हाती लागले नाही म्हणजे झाले." मालकाच्या घोड्यावर बसून नोकर भरधाव वेगाने सामाराकडे निघतो. मालक नंतर काही कामासाठी बाजारात जातो, तेव्हा त्याला मृत्यूदेवता दिसते. तो तिला विचारतो, "देवी, आज सकाळी धमकीवजा इशारा देणाऱ्या नजरेने तू माझ्या नोकराकडे पाहिलेस म्हणे". तेव्हा ती उत्तर देते, "अरे, माझ्या नजरेत धमकीवजा इशारा नव्हता. आश्चर्य होते. त्याला या गावात बघून मी चकित झाले होते. हा माणूस बगदादमध्ये कसा असा विचार माझ्या मनात आला. कारण आज रात्री सामारा गावात त्याची माझी गाठ पडणार आहे ना ?"*

बस्स ! एवढीच कथा. माणूस नियतीला चुकवू पाहतो, पण नियतीचा खेळ काही वेगळाच असतो. माणसाला तो कळत नाही. तिच्याच व्यूहात तो अडकत असतो. हे मनावर ठसवणारी ही

कथा. उत्कंठा, कुतूहल, अनपेक्षित कलाटणी यासारखे सर्व घटक तिच्यात दिसतात.

'दि लेटर'मध्येही अशीच कलाटणी वाचकांना स्तिमित करते. विवाहित ॲना क्लेअरमाँट हिला तिचा प्रियकर पत्र पाठवतो, नवरा दूर गेलाय असे बघून ती ते पत्र वाचत राहते. पण तिच्या मागून नवराही ते पत्र वाचून म्हणतो, ''कोणा हलकट नालायक माणसानं विवाहित स्त्रीला असलं घाणेरडं पत्र लिहिलंय ?'' ॲना दचकते. पण प्रसंगावधान राखून आपल्याकडे येणाऱ्या मैत्रिणीला ते पत्र देत म्हणते, ''फॅसिनेटिंग, माय डिअर. पण मला तुझीच काळजी वाटते. तुझ्या नवऱ्याला पत्ता लागू नये म्हणजे झालं.''

'लव्ह ॲट फर्स्ट साइट' मध्ये रेल्वे प्लॅटफॉर्मवर लोकल पकडण्यासाठी घाईत असलेल्या अँड्र्यूला समोरच्या प्लॅटफॉर्मवर एक पाच फूट आठ इंच उंचीची बदामाकृती चेहऱ्याची, कुरळल्या केसांची युवती दिसते. तिचा डौलदार बांधा, गौर पोटऱ्या. त्याची नजर तिच्यावर खिळून राहते. तीही त्याच्याकडे बघून हसते, लाजते. त्याला खरे तर एका मुलाखतीसाठी जायचे असते आणि ती लोकल पकडली तरच वेळेवर पोचता येणार असते. तेवढ्यात दोन्ही प्लॅटफॉर्मवर दोन लोकल्स येतात. थांबतात आणि जातात. अँड्र्यू प्लॅटफॉर्मवरच उभा असतो आणि समोरच्या प्लॅटफॉर्मवर ती युवतीही उभी असते. धिटाईने हसत असते.

आणि या कथेचा शेवट जेफ्री आर्चर कसा करतो ?

''मी सांगतो ही कथा कशावरून, असं एव्हाना तुमच्या मनात आलं असेल. उत्तर सोपं आहे. अँड्र्यू आणि क्लेअर यांच्या लग्नाच्या दहाव्या वाढदिवसाला मी हजर होतो. तिथंच मला ही गोष्ट ऐकायला मिळाली.''

कोर्टात अनेकदा त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या, एक्स्पर्टसच्या साक्षी घेण्यात येतात, आणि त्या साक्षींच्या आधारे ज्युरी निर्णय घेतात. हुशार वकील अशा तज्ज्ञांना त्यांच्या मानसन्मानांचा गौरव करून हरभऱ्याच्या झाडावर चढवून काही मते त्यांच्या तोंडून वदवून घेतात आणि आपल्याला हव्या त्या निष्कर्षापर्यंत आणून ठेवतात. वर ''अशा प्रकारच्या पंचवीस खटल्यांपैकी किमान एकवीस प्रकरणात तरी माझ्या साक्षीमुळे आरोपींची निर्दोष सुटका झालीय असेही वदवून घेतात... दुसऱ्या खटल्यात याच हॅरीच्या एक्स्पर्ट साक्षीचा 'तेहतीस टक्के चूक करणाऱ्या तज्ज्ञ साक्षीदारामुळे एका निरपराध स्त्रीला आपलं आयुष्य तुरुंगात घालवावं लागू नये'' असा निर्देश करून, ज्युरीच्या लेखी तज्ज्ञाची साक्ष निरुपयोगी ठरवण्यात वकील यशस्वी होतात. या दोन्ही खटल्यांत आरोपींची सुटका होते, तेव्हा वकील सर टोबी एक्स्पर्ट हॅरीला सांगतात, ''या दोन्ही खटल्यांमध्ये माझे दोघे अशील सरळसरळ दोषी होते. पण ते दोन्ही खेपेला ज्युरींना कळू शकलं नाही.'' या शेवटच्या गौप्यस्फोटाने सर टोबीसारखे वकील आपल्या 'एक्सपर्ट' मित्राचा कसा चलाख वापर करून घेतात - हे वास्तव वाचकांनाही चक्रावून सोडते.

जेफ्री आर्चरच्या या उच्चभ्रू जगात प्रचंड उलाढालींमधून पैशांची देवाणघेवाण होत राहते. त्यात पैसा मिळवण्याचे वा गमावण्याचे अनेक चालाख मार्गही लीलया हाताळले जातात. क्लाएंट पाहून चाल खेळली जाते. कटकारस्थाने रचण्यात येतात. शिताफीने काटा काढला जातो. मानवी मनाचाही सखोल अभ्यास त्यासाठी असावा लागतो. कोणाला फसवायचे, किती फसवायचे याचेही काही आडाखे पाळावे लागतात. करूनसवरून नामानिराळे राहण्याचा धूर्तपणाही दाखवावा लागतो. अशी चालाख चतुर माणसे जेफ्री आर्चरच्या जगात भाव खाऊन जातात. एक खेळ म्हणून या सगळ्या चाली त्यांच्या चालू असतात.



जेफ्री आर्चरच्या निवेदनशैलीचे एक वैशिष्ट्य असते. अगदी पहिल्या परिच्छेदात तो वाचकाला विश्वासात घेतो. कथानक कुठल्या दिशेने जाणार हे नेमके सूचित करतो. त्याच्या कादंबऱ्यांबद्दलही असे सांगतात की तो पहिल्या पानातच आपल्या कांदबरीचा प्लॉट सांगून टाकतो आणि कादंबरीभर त्या प्लॉटचे तपशील भरत राहतो. तरीही वाचक एकदा हाती घेतलेले पुस्तक शेवटपर्यंत हातातून सोडत नाही. ही त्याच्या शैलीची करामत !

'क्राईम पेज्' या कथेच्या पहिल्या एकदोन परिच्छेदात जेफ्री आर्चर सांगतो, ''केनी मर्चंट - हे काही त्याचं खरं नाव नव्हे. पण तसं बघायला गेलं तर केनीबद्दल खरीखुरी माहिती फार कोणाला नव्हतीच- तर या केनीनं सकाळीच आपल्या योजनेतील पहिला टप्पा अमलात आणण्यासाठी हॅरॉडस शॉपिंग सेंटरची निवड केली होती '' आठवडाभर केनी त्या दुकानात अनेकदा येऊन गेला होता. रंगीत तालीम करीत होता. आज मात्र तो स्वत:ला अटक करून घेण्यासाठी पद्धतशीर योजना आखत आहे. हे, वाचून वाचकाचे कुतूहल चाळवले जाणारच. लोक चोऱ्या करून अटक टाळण्याचा प्रयत्न करतात, येथे हा जगावेगळा माणूस चोरी करून स्वत:ला अटक व्हावे म्हणून योजना आखत आहे तर त्यामागे त्याचे काहीतरी रहस्यमय कारण असणारच. ते काय असावे या जिज्ञासेने वाचक पुढे वाचत राहतो आणि जेफ्री आर्चर एकेक तपशील सांगत ही जिज्ञासा अधिकाधिक वाढवत नेतो.

केनी ठरल्याप्रमाणे दुकानात जातो, चांदीची कफलिंक्स घेऊन क्लोज सर्किट टीव्हीकडे तोंड करून ती खिशात घालतो. सिक्युरिटी गार्डने पकडल्यावर चौकशीला तोंड देतो. पोलिस त्याला मॅजिस्ट्रटपुढे उभे करतात. तो गुन्हा कबूल करतो. एवढेच नव्हे तर 'गेल्याच आठवड्यात मी त्या अमुक दुकानातून घड्याळ चोरलं होतं. ते परत करायची माझी इच्छा आहे' असे आपण होऊन सांगून घराच्या झडतीसाठी पोलिसांना प्रवृत्त करतो. त्याच्या घरात चोरीचा माल खच्चून भरलेला असतो... इन्स्पेक्टरला तो सांगतो, ''ह्या वस्तू चोरीच्या आहेत हे तुम्हाला सिद्ध करावं लागेल. तसं न केलं तर त्या माझ्या मालकीच्या आहेत हे आपोआपच कायद्याने सिद्ध होईल आणि त्या वस्तूंची मला विक्री करता येईल.''

.... जज्ज त्याला दोन वर्षांची शिक्षा करतात, पण त्याआधी त्या मालाच्या उघड विक्रीतून तो ८६ हजार पौंड बँकेत जमा करतो. हाच केनी नंतर एक मासिक काढून पुन्हा पुन्हा लाखो पौंड मिळवतो- पण त्या प्रकरणाची हकीकत मूळातूनच वाचणे इष्ट !

'चॉक अँड चीझ' ही दोन भावांची गोष्ट आहे. रॉबिन हा चित्रकार आहे. तर जॉन एका औद्योगिक कंपनीत ट्रेनीपासून सुरुवात करून उच्चस्थानी गेलेला उद्योगपती. आईला जॉनपेक्षा आपल्या चित्रकार मुलाचे कौतुक जास्त. हा उद्या जगभर नाव काढणार म्हणून तिचे त्यावर विशेष प्रेम... रॉबिनची चित्रप्रदर्शने भरतात. काही चित्रे विकली जातात. परंतु त्याच्या वाट्याला अपेक्षित यश कधी येत नाही. तरीही जॉनपेक्षा आपण श्रेष्ठ हे तो दाखवतच राहतो. रॉबिन अधूनमधून जॉनकडे पैसे घेत राहतो. जॉनही उत्तमोत्तम चित्रकारांच्या चित्रांचा संग्रह करीत राहतो. जॉनच्या मृत्यूपत्रात त्याने आपल्या चित्रसंग्रहाची वाटणी करण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सूत्रे दिलेली असतात. ''एकूण ८१ मूल्यवान चित्रांपैकी पत्नी व दोन मुले यांनी प्रत्येकी वीस वीस चित्रे निवडावीत. उरलेली २१ चित्रे रॉबिनला द्यावीत. या चित्रांच्या आधारे तो स्वत:च्या खऱ्या पात्रतेनुसार योग्य त्या राहणीमानाने स्वत:चा निर्वाह करू शकेल''... त्याप्रमाणे रॉबिनकडे २१ चित्रे येतात. जेफ्री आर्चर वाचकांना येथेही चक्रावून सोडतो. कारण ती सर्व चित्रे रॉबिननेच काढलेली असतात

'ए चेंज ऑफ हार्ट' मधील गौरवर्णीय स्टोफेल व्हॅन देन बर्ग हा केपटाऊनचा रहिवाशी काळ्या नोकरचाकरांच्या सहवासात मोठा झालेला क्रिकेटपटू. काळ्यांकडे तुच्छतेने बघणारा. पुढे बँकेत उच्चपदी गेलेला तो एका अपघातात सापडतो. त्या अपघातात जखमी झालेल्या दुसऱ्या लॉरी ड्रायव्हरच्या हृदयाचे रोपण स्टोफेलच्या शरीरात केले जाते व त्याला जीवदान मिळते. तो लॉरी ड्रायव्हर कृष्णवर्णीय असतो. डॉक्टर स्टोफेलला सांगतात, ''तुमची हृदयरोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे. तो माणूस काळा होता की गोरा याची तुमच्या शरीराला काहीही जाणीव नाही. नवऱ्याच्या मृत्यूला कारणीभूत झालेल्या माणसाला आपल्या नवऱ्याच्या हृदयाचं दान करणाचा मोठेपणा त्याच्या पत्नीनं दाखवला... त्यामुळं आणखी तीनचार वर्षं तरी तुम्हाला धोका नाही.'' हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यावर स्टोफेल बँकेतील नोकरीचा राजीनामा देऊन त्या मृत लॉरी ड्रायव्हरच्या बायकोला भेटतो. मदतीची तयारी दाखवतो. पण ती काहीही मागत नाही. तेव्हा स्टोफेल आपल्या आयुर्विम्यावर कर्ज काढून काळ्या मुलांना क्रिकेट खेळण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना आखतो आणि कृष्णवर्णीयांच्या वस्तीवस्तीवर जाऊन मुलांना मैदान मिळवून देतो. खेळाचे साहित्य देतो. प्रशिक्षण देतो. इंग्रजीही शिकवतो... चार वर्षांनी तो मरण पावतो तेव्हा त्याच्या अंत्ययात्रेला गोरे जास्त की काळे जास्त हे ठरवणे अवघड ठरते. स्टोफेलने आपल्यापरीने वर्णद्वेषाविरुद्ध दिलेल्या त्या लढ्याचे अप्रूप सर्वांनाच जाणवलेले असते.

एखाद्या हकिकतीसारखीच ही गोष्ट सांगितलेली गेली आहे. तिच्यात तशी कुठली कलाकुसर नाही. आकृतिबंधाचा आखीव आटापिटा नाही. परंतु काळ्या गोऱ्या भेदाचे संस्कार घेऊन जगलेल्या व्यक्तींच्या हृदयात परिवर्तन घडू शकते, घडते हे समर्थपणे पटवून देणारी ही सत्य घटना आहे.

...जेफ्री आर्चरच्या कथा या घटना व्यक्तिप्रधान नाट्य पकडू पाहतात. या व्यक्ती विलक्षण वृत्तिविशेष दाखवतात, चमत्कृतिपूर्ण घटनांमध्ये त्या सापडतात. कुठलाही आव न आणता आपला जीवनमार्ग चोखाळत राहतात.

वकिलीच्या क्षेत्रातले व न्यायालयाच्या कामकाजातले अनेक बारकावे या कथांमध्ये दिसतात; आणि त्याचा फायदा संबंधितांनी हिशेबीपणने मिळवलेला दिसतो.

टू मेनी कोइन्सिडन्सेस - अनेक योगायोग या कथेतील रूथला पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमतेचा एक तृतीयांश वाटा म्हणून ६२ लाख पौंड मिळतात. त्यासाठी कायद्यातील एका तरतुदीचा फायदा तिला मिळालेला असतो. लग्नाला तीन वर्षे झाली असतील तर डायव्होर्सच्या खटल्यातील काही तरतुदी लागू होत नाहीत, या कलमाच्या आधारे तिला ही मालमत्ता मिळते असे तिच्या वकिलांकडून सांगण्यात येते.

मानवी स्वभावाचे चित्रविचित्र नमुने आणि आपल्या मध्यमवर्गीय चौकटीबाहेरचे अनुभव यामुळे या कथा वाचकाच्या मनाला मोहवतात. हे अनुभव एवढे वैचित्र्यपूर्ण आहेत की ते सांगताना फारशी कलाकुसर करावी लागत नाही वा लांबण लावावी लागत नाही. ''थोडक्यात सांगायचे झाले तर-'' या नावाद्वारेच जेफ्री आर्चरने या संग्रहाचे वेगळेपणे प्रथमदर्शनीच ठसवण्याची किमया केली आहे.

**पृष्ठे : - किंमत : १८० रु. सभासदांना : १३५ रु. पोस्टेज :२०रु.**



## शेवटी प्रेम आणि मैत्री या समजून घेण्याच्याच गोष्टी असतात !

# हरवलेल्या वाटा

## माधवी देसाई




'हरवलेल्या वाटा' या माधवी देसाई यांच्या कादंबरीत विवाहानंत दुरावलेल्या दोन जोडप्यांच्या कहाण्यांद्वारे सामंजस्।चा संदेश देण्यात आला आहे.

ॲडव्होकेट विजयकुमार जगदाळे हे एक प्रथितयश वकील. विशिष्ट मूल्ये राखून वकिली पेशाचा सन्मान वाढविणारे. आर्थिक मोह न बाळगता नीतिमूल्यांच्या कसोटीवर उतरणाऱ्या अशिलांच्याच केसेस घेणारे. ''आमचा धंदा खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करण्याचा आहे हे खरं, पण शेवटी आम्हीही माणसं आहोत. सुशिक्षित आहोत. अजून नीतिमूल्यं कोळून प्यालो नाही'' त्यांच्याकडे डॉ. सौ. तेजस्विनी मेहेंदळे ही अशील म्हणून येते, आणि सांगते, ''माझं वकीलपत्र द्यायचं तर तुम्हालाच, नाहीतर केस लढवायची नाही असं मी ठरवलंय. नाहीतर हार मान्य करण्याखेरीज माझ्याकडे दुसरा मार्ग नाही'' या तिच्या विनवणीला ॲड. विजय वाटाण्याच्या अक्षता लावतात. ती कार्ड ठेवून निराश होऊन परत जाते.

करिअरमागे धावणाऱ्या आधुनिक स्त्रियांबद्दल ॲड. विजयना एक प्रकारची अढी वाटते. त्यांच्या अहंकारापासून समस्या निर्माण होतात; त्या सामंजस्याने सोडविण्याऐवजी त्या स्त्रिया कोर्टाकडे धाव घेतात, याबद्दल त्यांच्या मनात राग खदखदत असतो. त्याचे एक कारणही असते. त्यांची पत्नी रेणू ही राजू या पुत्राला घेऊन घर सोडून गेलेली असते, आणि त्यामुळे त्यांना सर्व वैभव निरर्थक वाटत असते. हे सारे वैभव आपण मिळवले खरे पण तिचं नशीब नाही भोगायचं, गेली निघून या विचाराने ते अस्वस्थ असतात.

रेणू घर सोडून का गेली ?

खरे तर रेणू ही त्यांची रत्नागिरीपासूनची बालमैत्रीण, मामेबहीण. तिच्याबरोबर त्यांनी वाळूत किल्ले बांधलेले. सावत्र आईच्या जाचामुळे छोट्या विजयला रत्नागिरीला मामांकडे राहावे लागते. जन्मगाव, बालपणचे मित्र सर्व दुरावते.

शिक्षणासाठी पुण्याला गेलेला विजय वकिली शिकणाऱ्या श्रीमंत घराण्यातील आभाच्या प्रेमात पडतो. लग्नाच्या आणाभाका होतात. परंतु इकडे अंथरुणाला खिळलेले मामा एम. ए. झालेल्या रेणूबरोबर विजयचे लग्न करण्याची इच्छा व्यक्त करतात. ''तुझ्या होकारानं हे घर सुखी होणार आहे. जाणाऱ्या जिवाला शांती मिळेल असाच निर्णय तू घेशील असा मला विश्वास आहे.''

असे पण लिहितात. विजयला कोंडीत पडल्यासारखे होते. रेणू म्हणजे त्याला काकूबाई वाटते. हिच्यासोबत जन्म काढण्याची कल्पनाही असह्य होते. पण रेणूमध्ये यशस्वी संसार करण्याला लागणारे सगळे गुण आहेत. ती बुद्धिमान, मर्यादशील आणि कर्तृत्ववान आहे, हेही त्याला जाणवते आणि मृत्यूपूर्वी मामा त्या दोघांचे हात एकमेकांच्या हाती देतात. मामी रेणू-विजयचे लग्न लावून नंतरच विजयला मुंबईला जाऊ देतात. रत्नागिरीत वकिली करण्याची कल्पना त्याला रुचत नाही. मुंबईतच खरी संधी आहे हे त्याला कळून चुकते. लग्नानंतरही शिक्षणासाठी तो एकटाच मुंबईत राहणार होता. चारपाच वर्ष तरी. आभा त्याच्या लग्नाची हकीकत ऐकून संतप्त होते. बॅरिस्टर चौबळ यांच्या हाताखाली विजयची वकिली सुरू होते. आभाशी लग्न न झाल्यानं विजय मनोमन दु:खीकष्टी असतो. आभा लग्नच करीत नाही. प्रॅक्टिस करण्यात रमते.

लग्नानंतर चार वर्षांनी मुंबईला आलेल्या रेणूला विजय सांगतो, ''रेणू, तुझं माझं लग्न हा एक करार आहे. उपकाराच्या परतफेडीचा करार ! तो तू समजून वागावंस. योगायोगानं तू माझी पत्नी आहेस. या घरात तू राहू शकतेस, पण मर्यादा पाळता आली तरच ! माझ्या मन:स्वास्थ्याला धक्का लागणार नाही इतकंच पाहा.'' दोघे अबोलपणे एकाच घरात राहतात. रेणू आभाविजयची जवळीक समजून घेते. तक्रार न करता निमूट राहते. ''रेणूचं व माझं लग्न हा उपकाराच्या परतफेडीचा एक करार आहे'' या विधानावर आभा म्हणते, ''ही तुझी बाजू झाली. पण रेणूचं तुझ्यावर लहानपणापासून प्रेम आहे म्हणून तर मामांनी तुला लग्नाची गळ घातली.'' एका बेसावध क्षणी रेणू-विजय जवळ येतात. तृप्त होतात. पण विजय तरीही हट्टाने सांगतो, ''पुन्हा असले प्रसंग होणार नाहीत याची काळजी घे.'' त्यानंतर रेणू आपला शाळकरी मित्र रघू याच्याबरोबर रत्नागिरीला माहेरी जाते... काही दिवसांनी रघू त्याचे अभिनंदन करून म्हणतो, ''विजय, मला वाटलंच होतं तू कितीही नाटक केलंस तरी अखेर जीत रेणूचीच होणार... लेका, तू आता बाप होणार आहेस.'' तरीही विजयची नाराजी हटत नाही. राजूचा जन्म झाल्यावरही तो दोन वर्षे रेणूकडे जात नाही. शेवटी रेणूच मुंबईत येते. राजूच्या रूपात आपली प्रतिकृती बघताना विजय अस्वस्थ होतो. ''हे मूल माझं कशावरून ?'' या त्याच्या प्रश्नाने व्यथित होऊन ती शांतपणे राजूसह ते घर सोडून निघून जाते. त्या घटनेलाही दोन वर्षे होतात.

-आणि इकडे आभाचा लकडा सुरू होतो. ''तू रेणूशी घटस्फोट घे. आपण लग्न करू.''

आणि अशा मानसिक द्वंद्वात तो अडकलेला असताना डॉ. तेजस्विनी आपली केस घेऊन त्याच्याकडे जाते.

ॲड. विजय तिची कहाणी ऐकतो. तरी खरे तर त्याच्या व रेणूच्या प्रेमाच्या कहाणीसारखीच असते. डॉ. प्रशांत याला तेजस्विनीकडून घटस्फोट हवा आहे. आपल्या मुलीचा ताबाही हवा आहे. परंतु तिला घटस्फोट नको आहे. कारण या घटस्फोटाने प्रशांत उद्ध्वस्त होईल आणि मुलीला-आशूलाही जगणं अवघड होईल, अशी भीती तिला सतावत आहे. स्वत:बद्दल ती म्हणते, ''मी आहेच कुठं ? मी जी उरले आहे ती फक्त जिवंत अस्तित्व असलेली आणि जिवंत आहे म्हणून धडपडणारी... मी जिवंत असणं ही गरज आहे. माझी, माझ्या मुलीसाठी.'' प्रशांतच्या आईवडिलांची इच्छा अशी की तेजस्विनीने पुढे फार न शिकता नवऱ्याला दवाखान्यात मदत करावी. पण नवऱ्याची इच्छा डावलून तेजस्विनी मुंबईत पुढचे शिक्षण घेते आणि तिला आपल्या नवऱ्याच्या वैचारिक भूमिकेची प्रथमच जाणीव होते. घराला शोभा आणणारी पत्नी त्याला हवी असते. कर्तृत्ववान पत्नी नको असते. तरीही तेजस्विनी आपले शिक्षण पुढे चालू ठेवते. प्रशांत तिचा



जाणूनबुजून कोंडमारा करू पाहतो तेव्हा तिला आपल्या अस्मितेची जाणीव अधिकच प्रखरपणे होते. मला गृहिणी व्हायचं आहे तसंच डॉक्टरही- हे ती गृहीत धरून चालते. स्त्रीरोगतज्ज्ञ होऊन पुण्याला तेजस्विनी नवऱ्याकडे येते. तेव्हा तिला दिवस जातात. नवरा म्हणतो, ''छान झालं. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग होईल. शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढं काय करायचं हा प्रश्न आता तुला पडणार नाही. एक खेळणं मिळालं तुला !'' मुलगा दोन वर्षांचा झाल्यावर तेजस्विनी ससूनमध्ये नोकरी मिळवते. संसार मोडावा असे मनातही आणत नाही. स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून तिचे नाव होते. एका कॅन्सर पेशंटच्या निमित्ताने ती अमेरिकेलाही जाऊन येते. महेंद्र चटोपाध्यायशी तिची मैत्री वाढत जाते, तसतसे नवऱ्याचे वागणे बेबंद होत जाते. वाद होऊ लागतात.

''तू मला, एका डॉक्टरला मागणी घातली होतीस. नाहीतर साधी मुलगी बघून लग्न करायचं होतंस. लग्नाआधी एवढं नाटक केलंस आणि आता असा बदलून गेलास ?'' हा तिचा युक्तिवाद नवऱ्याला सलू लागतो.

महेंद्र-तेजस्विनी यांच्या मैत्रीबद्दल तेजस्विनी सांगते, ''हो. फक्त मैत्री ! त्या मैत्रीमधले रेशीमबंध, नाजूक सीमारेषा हे सारं न बोलताच आम्ही पाळत होतो. कुणीतरी सोबत आहे व ती सोबत एक जाणिवेतून वाटचाल करीत आहे ही भावना विलक्षण आहे. शेवटी प्रेम, मैत्री या सर्व समजून घेण्याच्या आणि जपण्याच्याच गोष्टी आहेत ना ?'' (८८)

या वक्तव्याच्या संदर्भात रेणू व राघू या बालमित्रांच्या प्रेमाचा नवा अर्थ ॲड. विजयना उमगतो, आणि आपल्या वर्तनातील चुकीची जाणीव होते.

तेजस्विनी घटस्फोटाला नकार देताना म्हणते, ''माझं प्रशांतवर जीवापलीकडे प्रेम आहे. जगामधल्या साऱ्या सुखांची गोडी त्यानंच मला दाखवायची होती. पण तसं घडलं नाही. त्यानं जे मला दाखवलं ते फक्त हिणकस होतं. ते सुख ओरबाडणं होतं. भोगणं नव्हतं. किळस आली मला त्या प्रकारची.''(९१)

या पुरुषी मनोवृत्तीची चिरफाड डॉ. तेजस्विनी करताना म्हणते, ''आपल्यापेक्षा स्त्रीचा सृजनशीलता हा गुण अधिक सरस आहे, हे पुरुषाला जाणवलं त्या क्षणी तो तिची मनातून भीती बाळगू लागला असावा, आणि तिला जखडून ठेवण्याचं एक साधन गवसल्याचा आसुरी आनंदही त्याला झाला असावा. स्त्री शक्तिशाली आहे, तिच्या पायात एक लवचिक साखळदंड आहे. जिथं ती अगतिक आहे ते आहे तिचं मातृत्व... हे मातृत्व ही माझ्या पायात जाणूनबुजून अडकवलेली एक बेडी आहे, हे मला समजत होतं. तरीसुद्धा त्याविरुद्ध माझी तक्रार नव्हती. मी सर्व सोसत होते.'' (९१)

ॲड. विजय यांना आपल्या मुलाचे स्मरण होते. पत्नीचे स्मरण होते. आपला राग रेणूवर असायला हवा होता. राजूवर का ? आणि रेणूवर तरी का ? केवळ तिनं आपल्यावर प्रेम केलं म्हणून ? असा त्यांना प्रश्न पडतो.

तेजस्विनीला योग्य मार्ग दाखवायचा असेल तर आपल्याला आपली वाट आधी शोधता आली पाहिजे. जो स्वत: भटकतो आहे तो दुसऱ्याला मार्ग कसा दाखवणार ?

ॲड. विजय आपल्यासमोरच्या दोन खटल्यांमधले साम्यभेद न्याहाळतात. डॉ. प्रशांतला भेटून त्याबद्दल चर्चा करतात; आणि काही निर्णयापर्यंत येतात. तेजस्विनीला ते सांगतात, ''प्रशांतनं माणुसकीच्या भावना पार संपवून टाकल्या आहेत... तुम्ही जीव झोकून त्याच्यावर प्रेम केलंत पण अपात्री दान झालं ते ! त्या झोकून देण्याची निशाणी आशू आहे ना तुमच्याजवळ ?.. मग एक

अवघड ऑपरेशन पार पाडतोय असं समजा. जखम दुखणारच. पण ती कालांतराने भरूनही येईल... तुम्ही भेटला नसतात तर मीही खूप चांगलं गमावलं असतं आयुष्यात. तुम्हाला समजून घेताना मी स्वत:ला ओळखू लागलो. रेणूला ओळखू लागलो. लख्ख प्रतिबिंब दिसत होतं आमचं तुमच्या कहाणीत...''

पतिपत्नीतील दुराव्याला अनेक कारणे असतात. आत्मप्रतिमा आणि दुसऱ्याकडून अपेक्षा यात तफावत असते. मैत्रीचाही कधी कधी नेमका अर्थ उमगत नाही. माधवी देसाई यांनी दोन्ही बाजू स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. सामंजस्य व सहकार्य यांची गरज असते. पण जेथे त्याबाबत अनास्था असेल तेथे दूर होणेच श्रेयस्कर असा संदेश या देऊ पाहतात.

स्त्रीने आपल्या पुरुषी वर्चस्वाला आव्हान देणे अनेकांना रुचत नाही; त्यामुळेही अनेक तणाव निर्माण होतात. ॲड. विजय, रेणू, आभा, राघू हा चौकोन एकीकडे तर डॉ. तेजस्विनी- डॉ. प्रशांत व महेंद्र हा त्रिकोण दुसरीकडे. दोन्हीतही निरपेक्ष निर्व्याज मैत्रीचे अधिष्ठान. दोनही प्रकरणात अपत्याची 'जादा' उपस्थिती भावकल्लोळ खेळवते.

माधवी देसाई यांनी रेणू, आभा, तेजस्विनी या व्यक्तिरेखा चांगल्या फुलवल्या आहेत. तरी विजय, प्रशांत, महेंद्र, राघू यांनाही न्याय दिला आहे. त्यामुळे या हरवलेल्या वाटा शेवटी खऱ्या शाश्वत वाटेकडे नेतात.

**पृष्ठे : ११० किंमत : ८० रु. सभासदांना : ६०रु. पोस्टेज :२०रु.**

## दिवाळी अंकानिमित्त वाचकांसाठी नवी स्पर्धा



# पुरस्कार

### मन प्रगल्भ करणे, हे साहित्याचे काम

''मानवी मन प्रगल्भ व सुसंस्कृत करणे हे साहित्याचे काम आहे'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने बालसाहित्यकार दत्ता टोळ यांना बाबूराव शिरोळे पुरस्कार व कवयित्री आसावरी काकडे यांना शांतादेवी शिरोळे पुरस्कार श्री. मिरासदार यांच्या हस्ते देण्यात आला. ''साहित्याचे मोल समाजासाठी महत्त्वाचे आहे. मानवी मन स्वार्थी असते. आपणास पाहिजे ते मिळवणे यासाठी आपला खटाटोप चालू असतो. म्हणून ही भावना दूर करून त्यांच्यात बदल घडवण्याचे काम साहित्याला करावे लागते. कविता लिहिणे ही साहित्यातील सर्वांत अवघड गोष्ट आहे. कमी शब्दांत भावनांचा आविष्कार करण्याचे काम कवीला करावे लागते. बालिश लिहिणे म्हणजे बालसाहित्य नाही. मुलांचे मन जिंकून त्यांच्यावर संस्कार करण्याचे काम बालसाहित्यकारांना करावे लागते,'' असेही त्यांनी नमूद केले.

दत्ता टोळ म्हणाले, ''आज भरपूर बालसाहित्य आहे; पण त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनुकरण झालेले दिसते. मुलांचे भावविश्व, त्यांची मानसिकता लक्षात घेऊन लेखकांनी लिहिले, तर चांगली पुस्तके तयार होतील, आज मुले दूरचित्रवाणी पाहत बसतात. चांगली पुस्तके वाचण्यासाठी पालकांनी त्यांना प्रवृत्त केले, तर मुले आपोआप वाचनाकडे वळतील.''

आसावरी काकडे म्हणाल्या, ''बालसाहित्य आणि कुमारसाहित्य अलग असून, कुमार साहित्यासाठी कसदार लिखाण करण्याची गरज आहे.''

### सुसंस्कार करणाऱ्या शिक्षकांची समाजाला गरज आहे.

''विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता, त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्यावर सुसंस्कार करणाऱ्या शिक्षकांची समाजाला फार गरज आहे,'' असे मत माजी खासदार अण्णा जोशी यांनी पुणे येथे व्यक्त केले.

साने गुरुजींच्या शिकवणीनुसार आचरण करणाऱ्या व विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या आशा कांबळे, जीवराज टाकळीकर व धनंजय शिंपी या तीन शिक्षकांचा साधना संस्थेतर्फे 'साने गुरुजी संस्कार साधना पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. एक हजार रुपये व प्रशस्तिपत्र असे त्यांचे स्वरूप आहे. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते डॉ. कुमार सप्तर्षी व नगरसेवक डॉ. सतीश देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष प्र. द. पुराणिक यांनी प्रास्ताविक केले. संध्या हिंगणे यांनी आभार मानले.

### माडगूळकर कथाकथन स्पर्धा आटपाडीमध्ये होणार

आटपाडी येथील व्यंकटेश माडगूळकर कथाकथन महोत्सव समितीने त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त कथाकथन स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा २५ जुलै ते २८ ऑगस्ट या कालावधीत दर शनिवारी घेण्यात आली. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे पाच हजार,

तीन हजार आणि दोन हजार रुपयांची बक्षिसे दिली गेली. अध्यक्ष सादिक पापमियाँ खटिक, आटपाडी (दूरध्वनी ०२३४३ २२९९६)

### वपुंचा पहिला स्मृतिदिन

पुणे येथील भरत नाट्य मंदिरात २६ जून २००२ रोजी व. पु. काळे यांचा पहिला स्मृतिदिन साजरा करण्यात आला. हा उपक्रम वपु स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने शिरीष रायरीकर यांच्यातर्फे दरवर्षी होणार आहे. या वर्षी कथाकथनाच्या स्पर्धा आयोजित करून ४ मुलामुलींना वपु स्मृति प्रतिष्ठानतर्फे रोख पारितोषिके देण्यात आली.

वपु काळे यांच्या सर्व ५२ (बावन्न) पुस्तकांच्या प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे या प्रकाशन संस्थेने घेतले आहेत. यावेळी मेहता प्रकाशनाच्या 'स्वर', 'इंटिमेट' आणि 'संवादिनी' या वपुंच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन शिवाजी सावंत आणि डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांच्या हस्ते झाले. मेहता प्रकाशनच्या सुनील मेहता यांचा सत्कार शाल व श्रीफळ देऊन शिवाजी सावंत यांनी केला. मुंबईचे डॉ. पंत वैद्य आणि डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांनी वपुंच्या आठवणी सांगितल्या. नंतर रेखा मुंदडा यांचे कथाकथन झाले. रेखा मुंदडा वपु यांना गुरुस्थानी मानतात. याप्रसंगी वपुंच्या कन्या सौ. स्वाती चांदोरकर व चिरंजीव सुहास काळे उपस्थित होते.

### यशवंत मनोहर यांना विखे-पाटील साहित्य पुरस्कार

प्रवरा औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक समूहातर्फे 'पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार' या वर्षी या यशवंत मनोहर (नागपूर) यांच्या 'जीवनायन' या काव्यसंग्रहास व अहमदनगर जिल्हा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार संजय कळमकर यांच्या 'भग्न' या कादंबरीस देण्यात आला.

सहकारी साखर कारखानदारीचे आद्यप्रर्वतक पद्मश्री विखे पाटील यांच्या १०२ व्या जन्मदिनानिमित्त प्रवरानगर येथे २२ ऑगस्टला हे पुरस्कार प्रसिद्ध साहित्यिक निर्मलकुमार फडकुले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विखे पाटील पुरस्कार पंचवीस हजार रुपयांचा व जिल्हा साहित्य पुरस्कार दहा हजार रुपयांचा आहे. पुरस्काराचे हे अकरावे वर्ष आहे.

नांदेडच्या मथू सावंत यांचा 'तिची वाटच वेगळी' हा कथासंग्रह, कोल्हापूरचे गोविंद पाटील यांचा 'गावकीर्तन'हा काव्यसंग्रह आणि संगमनेरचे निवृत्ती महाराज कुरणकर यांचे 'अभंगवाणी' हस्तलिखित यांना विशेष पुरस्कार देण्यात आले. यंदा प्रथमच दोन उत्तेजनार्थ साहित्य पुरस्कार दिले गेले. नगरच्या मुबारक तांबोळी यांच्या 'मला भावलेले तुकोबा' या पुस्तकाची व डॉ. क्रांती अनभुले यांच्या 'पाझार' या काव्यसंग्रहाची त्यासाठी निवड करण्यात आली. एक हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीत डॉ. गोपाळराव मिरीकर, प्राचार्य विजय कसबेकर, प्रा. मेधा काळे व प्रा. दिघे यांचा समावेश होता.

### सुभाष भेंडे यांच्या 'काजळल्या दिशा'ला शंकर पाटील पुरस्कार

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या अपेक्षेने सुरू केलेली दलित चळवळ नेत्यांच्या स्वार्थीपणामुळे पुढे भरकटत गेली, याचे एक संवेदनशील लेखक म्हणून दुःख होते,'' असे प्रसिद्ध लेखक सुभाष भेंडे यांनी सांगितले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे राजेंद्र बनहट्टी यांच्या हस्ते 'काजळल्या दिशा' या कादंबरीसाठी



श्री. भेंडे यांना 'शंकर पाटील पारितोषिक' देण्यात आले.

दलित समाजातील ज्यांना प्रगतीची संधी मिळाली, त्यांनी पुढे आपल्या समाजातील गरिबांना ओळख दाखवणेही टाळले असल्याचे आपण पाहिले आहे, असे सांगून श्री. भेंडे म्हणाले, ''डॉ. आंबेडकरांनी ज्यांच्यासाठी चळवळ सुरू केली, ती मूक जनता आहे तेथेच आहे. चळवळीतील काही नेते मात्र आपल्या बांधवांचा केवळ वापर करून स्वत:ची प्रगती साधत राहिले, त्यामुळे चळवळीची अधोगती झाली. तेच दु:ख 'काजळल्या दिशा'मध्ये व्यक्त केले आहे.''

बिगरदलितांनी दलितांविषयी लिहिलेले साहित्य दलित म्हणता येईल का, या प्रश्नाचे आपल्याला समाधानकारक उत्तर मिळालेले नाही, असेही भेंडे यांनी सांगितले. ही कादंबरी विचारप्रधान आहे. दलित चळवळीच्या प्रगतीचे मार्ग कुंठित का झाले, याविषयी काही मार्मिक प्रश्न भेंडे यांनी वेधकपणे विचारले आहेत, असे राजेंद्र बनहट्टी यांनी सांगितले.

### डॉ. प्रभाकर ताकवले यांना शाहू पुरस्कार

''निरनिराळे धर्म माणसाला परमेश्वराकडेच नेतात, तर हे धर्म मानणाऱ्यांनी एकमेकांचा द्वेष का करावा, असा प्रश्न राजर्षी शाहू महाराजांनी विचारला होता. धर्मभेदामुळे एकमेकांचा द्वेष करणे चुकीचे आहे, असे त्यांनी सांगितले होते. त्यांचे हे विचार आजच्या स्थितीतही जसेच्या तसे लागू पडतात,'' असे मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांनी सांगितले.

शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल डॉ. प्रभाकर ताकवले यांनी शाहू महाराज पुरस्कार न्या. कोळसे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

ते म्हणाले, ''फुले, शाहू महाराज, आंबेडकर नसते, तर बहुजन समाज शिकू शकला नसता, हा इतिहास आपण समजवून घेतला पाहिजे. आपल्या राज्यात त्यांनी सर्वसामान्यांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत केले होते. सर्व पददलित समाजाच्या विकासाचा विचार करणाऱ्या शाहू महाराजांना त्यांच्या हयातीत आणि नंतरही आपण किती प्रतिष्ठा दिली, याचाही विचार केला पाहिजे. दीनदुबळ्यांना मदत करताना ब्रह्मदेव आडवा आला, तरी हे काम मी थांबविणार नाही, असे पत्र त्यांनी ब्रिटिशांना लिहिले होते. दीनदुबळ्यांची सेवा करणाऱ्यापैकीच प्रा. ताकवले आहेत. शाहू महाराजांच्या नावाने त्यांना दिला जाणारा हा पुरस्कार अतिशय योग्य आहे.''

डॉ. ताकवले म्हणाले, ''शाहू महाराज केवळ कोल्हापूर, महाराष्ट्राचे नव्हते, ते सारे साऱ्या जगाचे होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा नव्याने अभ्यास करणारे आंतरराष्ट्रीय अभ्यासक आता त्यांचे मोठेपण मान्य करीत आहेत. त्यांच्या नावाने उभ्या राहिलेल्या संस्थेच्या वसतिगृहात राहून मी शिकलो. त्यांच्याच नावाच्या महाविद्यालयात अध्यापनाची संधी मला मिळाली. त्यांच्या नावाने मला हा पुरस्कार मिळतो आहे, हे मी माझे भाग्य समजतो.''

पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. या पुरस्काराचे आधीचे विजेते शंकरराव जगदाळे आणि डॉ. पंजाबराव देशमुख या वेळी उपस्थित होते. प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या 'पुणे पीएमटी तोट्यात का' या निबंध स्पर्धेतील विजेत्यांनाही या वेळी बक्षिसे देण्यात आली. सुरेश परदेशी यांना पहिले, अभय दिवाण यांना दुसरे, तर पंडित हिंगे यांना तिसरे बक्षीस मिळाले.

### आठ जणांना कालिदास पुरस्कार

राज्य सरकारतर्फे दरवर्षी संस्कृत दिनानिमित्त आठ पंडितांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. नारळीपौर्णिमेला संस्कृत दिन साजरा करण्यात येतो.

महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कारासाठी पुण्यातील पंडित काशिनाथशास्त्री जोशी

यांची निवड करण्यात आली. रोख पंचवीस हजार रूपये, शाल व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. व्याकरण, तर्कशास्त्र, मीमांसाशास्त्र, वेदान्त आदी शास्त्रांचे अध्ययन व पन्नास वर्षे अखंडितपणे केलेला भागवतधर्माचा प्रसार यासाठी पंडित जोशी यांना हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारासाठी निवड झालेल्यांमध्ये डॉ. रामचंद्र एन. आरळीकट्टी (तिरुपती), पं. लक्ष्मीकांत बापू दीक्षित (नाशिक), पं. दत्तात्रय केशव आचार्य (अंबरनाथ), पं. गणेशशास्त्री रामकृष्ण पाठक (कोल्हापूर), पं. जैनेंद्रकुमार माणिकराव तुपकर (सोलापूर), प्रा. हरिश्चंद्र पांडुरंग रेणापूरकर (लातूर), व प्रा. विमल रघुनाथ लेले (संगमनेर) यांचा समावेश आहे.

पुरस्कार वितरण समारंभ २२ ऑगस्ट रोजी मुंबईत सिडनेहॅम महाविद्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झाला.

## अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सहा कलाकारांना खास पुरस्कार

पुण्यातील रंगभूमीच्या कलाकारांकडून इतर कलाकारांना नेहमीच प्रेरणा मिळत राहिली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते अमरीश पुरी यांनी केले.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद आणि कलारंग प्रतिष्ठान वर्धापनदिनानिमित्त विविध कलाकारांना श्री. पुरी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी सांस्कृतिक मंत्री प्रा. रामकृष्ण मोरे होते. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख बाबसाहेब धुमाळ या वेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात भास्कर चंदावरकर (बालगंधर्व पुरस्कार), दामू केंकरे (नानासाहेब फाटक पुरस्कार), मोहन जोशी (आचार्य अत्रे पुरस्कार), पं. सत्यदेव दुबे (जयवंत दळवी पुरस्कार), सोनाली कुलकर्णी (स्मिता पाटील पुरस्कार) या कलाकारांना सन्मानित करण्यात आले. विक्रम गाडकवाड, अनंत कान्हो, संदेश कुलकर्णी, दीपक राज दंडवते, वर्षा संगमनेरकर यांना विशेष पुरस्कार, तर प्रदीप तपस्वी, किरण येवलेकर, अप्पा रुपनार, मीनल कुलकर्णी व महेश शेजवळ या कलाकारांना हा कार्यक्रम सिद्धिविनायक ग्रुप पुरस्कृत पुरस्कार देण्यात आले.

श्री पुरी म्हणाले, ''कलाकारांची गणती केल्यास महाराष्ट्रात मोठ्या संख्येने कलाकार झाल्याचे लक्षात येईल. त्यात पुण्याचे वैशिष्ट्य वेगळे आहे. आम्ही हिंदी नाटके केली. त्याच्या यशाचा मापदंड हा नेहमी त्याला पुण्यात कसा प्रतिसाद मिळाला हा असे.'' प्रा. मोरे म्हणाले, ''प्रत्येक देशाचा सांस्कृतिक आविष्कार वेगळा असतो. आपल्या येथे परंपरेला महत्त्व आहे. परंपरा जपण्यासाठी तसेच भावी पिढ्यांसाठी संगीत नाटकांचे शासनाने चित्रीकरण केले आहे. तसेच यंदा लावण्यांचे चित्रीकरण करण्यात येणार आहे. शासनाच्या संगीत अकादमीचे कामकाज कसे चालावे, तेथे कोणत्या पद्धतीचे प्रशिक्षण द्यावे आदींबाबत ज्येष्ठ कलाकारांनी सूचना कराव्यात.''

## अरविंद शिरसाट यांना रावसाहेब गोगटे पुरस्कार

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा रावसाहेब गोगटे पुरस्कार 'सकाळ'चे सावंतवाडीतील बातमीदार अरविंद शिरसाट यांना जाहीर झाला आहे. १५००० रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक भारतकुमार राऊत यांना जाहीर झाला. अलिबाग येथील दैनिक कृषिवलचे संस्थापक प्रभाकर पाटील यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार 'चित्रलेखा'चे कार्यकारी संपादक ज्ञानेश महाराव यांना तर मराठवाड्यातील ज्येष्ठ पत्रकारांना दिला जाणारा नागोरावजी दुधगावकर पुरस्कार नांदेड येथील डॉ. नंदकुमार देव यांना जाहीर झाला.



## 'आंबेडकरवादी चळवळीची धार स्वाभिमान सोडल्याने बोथट'

''स्वाभिमान सोडून दयेचे राजकारण सुरू झाल्यामुळे आंबेडकरवादी चळवळीची धार बोथट झाली आहे,'' असे स्पष्ट मत प्रा. विलास वाघ यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या ग्रंथ पुरस्कार कार्यक्रमात ते बोलत होते. 'आंबेडकरवादी चळवळीची दिशा' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. माजी कुलगुरू डॉ. श्रीधर गुप्ते अध्यक्षस्थानी होते.

यंदा हे पुरस्कार नागपूरचे डॉ. अशोक भोयर ('माय एनकाउंटर विथ द्रोणाचार्य'), औरंगाबादचे डॉ. एस. एल. गायकवाड ('प्रोटेक्टिव्ह' डिस्क्रिमिनेशन पॉलिसी अँड सोशल चेंज), पुण्याच्या डॉ. माधवी खरात ('पत्रांच्या अंतरंगातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर'), आणि औरंगाबादच्या सुलभा मुंडे ('महात्मा फुले यांचे शूद्रातिशूद्राविषयी विचार') यांना डॉ. गुप्ते यांच्या हस्ते देण्यात आला. रोख रक्कम आणि सन्मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

''ज्या राजकीय उद्दिष्टाने डॉ. आंबेडकर यांनी चळवळ उभारली ती आता अस्तित्वात आहे की नाही, हे तपासण्याची वेळ आली आहे,'' अशा शब्दांत वाघ यांनी या चळवळीच्या आताच्या परिस्थितीचे वर्णन केले. ते म्हणाले, ''डॉ. आंबेडकर यांनी सर्वसमावेशक रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली; परंतु नेत्यांची महत्त्वाकांक्षा आणि व्यक्तिगत अहंकार यामुळे हा पक्ष एकसंघ राहिला नाही. राजकारणाच्या काठावर बसून सरकारवर दबाव आणण्याचे काम यांना करता आले नाही उलट तेच सरकारचे अंकित झाले. डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय वाटचालीचा त्यांच्याच अनुयायांनी पराभव केला आहे. दलितांच्या राजकारणाची जागा दयेच्या राजकारणाने घेतल्याने या चळवळीची धार बोथट झाली आहे.''

## यशवंतराव चव्हाण पुरस्कार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे २०००-२००१ या वर्षीच्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कारांची घोषणा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. रं. बोराडे यांनी केली. नवलेखकांना हे पुरस्कार देण्यात येतात. नाशिकच्या रेखा भंडारे यांना 'काळोखाचे काठ' या काव्यासाठी, पुण्याचे पी. के. जाधव यांना 'चोळी बांगडी' या कथेसाठी पुरस्कार दिला जाणार आहे. नगरचे विनय जोशी यांना 'पडसाद' या ललित गद्यासाठी, पुण्याच्या मंजिरी घाटपांडे यांना 'मन:स्थिती' या कादंबरीसाठी; तर मुंबईचे भि. वा. परब यांना 'शहाण्याला शब्दाचा मार' या बालकथेसाठी सन्मानित करण्यात येणार आहे. सर्वोत्कृष्ट प्रकाशकासाठी यंदाच्या वर्षापासून सुरू करण्यात आलेला पुरस्कार लेखक शरद काळे यांच्या 'केले मन वेगळे' या पुस्तकाच्या निर्मितीसाठी पुण्याच्या गमभन प्रकाशन संस्थेला प्रदान करण्यात येणार आहे.

## श्री. पु. भागवत यांना 'चतुरंग'चा जीवनगौरव पुरस्कार

'चतुरंग प्रतिष्ठान' या संस्थेच्या यंदाच्या सांस्कृतिक क्षेत्रीय जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ साहित्यिक-प्रकाशक श्री. पु. भागवत यांची निवड करण्यात आली आहे.

वाङ्मयीन संस्कृतीच्या वृद्धीसाठी आयुष्यभर केलेले अथक प्रयत्न, निष्ठापूर्वक जपलेली जीवनमूल्ये, वाङ्मयीन कलाकृतीच्या दर्जाचा आग्रह, विलक्षण संपादनदृष्टी, विचारप्रगल्भ व निश्चित अशा सांस्कृतिक व वाङ्मयीन दृष्टीकोनामुळे आधुनिक मराठी साहित्यात निर्माण केलेले नवनवे मापदंड, वर्षानुवर्षाच्या अध्यापनातून विद्यार्थी-विद्यार्थिनींची वाङ्मयीन जाण अधिकाधिक प्रगल्भ

करतानाच, 'मौज प्रकाशना'तील गेल्या ५२ वर्षांची वाङ्‌मयीन सेवा, अशा अनेक वैशिष्ट्यांची दखल घेऊन यंदाच्या जीवनगौरव पुरस्कारासाठी श्रीकृष्ण पुरुषोत्तम भागवत यांचे नाव निश्चित करण्यात आल्याचे निवड समितीने म्हटले आहे. मानपत्र आणि एक लाख रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप असून २१-२२ डिसेंबर रोजी होणाऱ्या चतुरंग संमेनलात हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

'लोकसत्ता'चे संपादक डॉ. अरूण टिकेकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक, रवींद्र पिंगे, डॉ. विश्वास मेहेंदळे, निशिकांत जोशी, विनोद ला. दोशी व सौ. प्रफुल्ला डहाणूकर यांचा समावेश होता. 'चतुरंग'च्या 'जीवनगौरव पुरस्कारा'चे हे बारावे वर्ष असून सांस्कृतिक क्षेत्रासाठी यापूर्वी भालजी पेंढारकर (१९९१), पु. ल. देशपांडे (१९९४), सुधीर फडके (१९९६), बाबासाहेब पुरंदरे (१९९८), आणि लता मंगेशकर (२०००) यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

### अरूण शौरी यांना 'बिझनेसपर्सन ऑफ दि इयर' पुरस्कार

केंद्रीय निर्गुंतवणूक मंत्री अरुण शौरी यांची इकॉनॉमिक टाइम्स दैनिकाच्या 'बिझनेसपर्सन ऑफ दि इयर' या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. निवड समितीचे अध्यक्ष व इन्फोसिसचे अध्यक्ष नारायण मूर्ती यांनी यासंबंधीची घोषणा मंगळवारी केली. 'श्री महिला गृह उद्योगा'स 'बिझनेसवुमेन ऑफ दि इयर' पुरस्कार देण्यात येणार आहे

इकॉनॉमिक टाइम्स पुरस्काराचा कार्यक्रम २१ ऑगस्ट रोजी सीएनबीसी चॅनेलवरील 'इंडिया बिझनेस अवर' कार्यक्रमात प्रक्षेपित करण्यात आला.

## निवेदन

### प्रकाशन व्यवसाय कार्यशाळा

गुरुवार दि. १४ ते बुधवार दि.२० नोव्हेंबर २००२ या राष्ट्रीय ग्रंथ सप्ताहाच्या काळात हस्तलिखितांची निवड, संपादन, ग्रंथनिर्मिती, विक्री व वितरण या ग्रंथप्रकाशनाशी संबंधित सर्व प्रक्रियांचा व कॉपीराईट, ग्रंथ नोंदणी वगैरे आवश्यक कायद्यांचा परिचय करून देणारी कार्यशाळा पुणे येथे आयोजित केली आहे.

किमान बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या कोणालाही कार्यशाळेत प्रवेश मिळू शकेल. प्रकाशन व्यवसायाशी संबंधितांना अग्रक्रम दिला जाईल. कार्यशाळेत फक्त ४० जागांसाठीच प्रवेश मिळू शकेल.

कार्यशाळेच्या संपूर्ण कार्यक्रमाचे शुल्क फक्त ७५०/- राहील. आवश्यक पुस्तके वगैरे अभ्यास साहित्य सर्व सहभागींना पुरविले जाईल. कार्यशाळेचे माहितीपत्रक व अर्जाची मागणी रू. १०/- मनीऑर्डरचे पाठवून वा रोख भरून खालील पत्त्यावर करावी. कार्यशाळेसाठी नावनोंदणी करण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत राहील.

**अध्यक्ष, शरद गोगटे**
**अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ,**
द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस
१२०० सदाशिव पेठ, लिमयेवाडी, पुणे ४११ ०३०



# फुले आणि काटे

### पाणी : महाराष्ट्राच्या सौभाग्याचा प्रश्न

'पाणी' हा लहानसा शब्द. अवघं विश्व व्यापून टाकणारा आहे. जगातल्या प्रत्येक जीवन घटकाशी बांधून असलेला 'पाणी' हा शब्द. 'आकांक्षा'च्या संपादिका श्रीमती अरुणा सबाने यांनी व महिला मंच यांनी मिळून घेतलेले हे पहिलं महत्त्वपूर्ण साहित्य संमेलन. संबंध महाराष्ट्राला पाण्याच्या प्रश्नांमधलं, साहित्यामधलं पुष्कळ काही नवं देऊन जाईल. पाण्याच्या संबंधी भारतीय साहित्यात कविता, कथा, कादंबरी असं विपुल साहित्य असणार. ते माझ्या फार वाचनात नाही. संस्कृत, हिंदी साहित्यातलंही थोडं वाचलेलं आहे. इथं थोडंबहुत मराठीचं तेवढं सागांयचा विचार आहे. कालिदासाच्या 'मेघदूता'ला भरलेलं पाणी घेऊन जाणारा आषाढातला मेघ लिहितं करतो. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, सावता, चोखा यांच्या कवितांमधून 'पाणी' अडविण्यापासून तलाव बांधून पाण्याला जिवंत कसं ठेवता येईल, यावरचं लेखन आहे. 'दुष्काळ व पाणी' असे दोन शब्द आता एकत्रच झालेले आहेत. १६३० च्या प्रचंड दुष्काळाचं वर्णन कवी रामदासांनी केलेलं आहे.

शिवाजी महाराजांच्या त्याच काळात भीषण पाणीटंचाईनं महाराष्ट्राची व शेतीबाडीची कशी वाताहत झाली याचं कुरतडणारं चित्र तुकारामांच्या अभंगांमधून आहे.

"दुष्काळ आटले द्रव्य गेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करता मेली ।
लज्जा वाटे जीवा यासाठी या दुःखे । वेवसाय देखे तुटी आली ।
नगरेची रचावी । जलाशये निर्मावी । महावने लावावी । नानाविधे ।"

अस संतकवी ज्ञानेश्वरांनी सातशे वर्षापूर्वी लिहून ठेवलेलं आहे.

महात्मा जोतिबा फुले यांचं शेती, पर्यावरण, पाणी, पाणलोट, दुष्काळ यासंबंधीचं लेखन त्यांच्या समग्र ग्रंथात आहे. त्याचवेळच्या कवी दत्त यांच्या 'बा, नीज गडे'सारख्या कवितेत दुष्काळानं ग्रासलेल्या संसाराचं तीव्र असं वर्णन आहे. गिरीश, यशवंत, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील यांचं प्रत्यक्ष शेतकरी जीवनातील दुःखाचं, त्यांच्या मीठभाकरीचं व बहरण्याचंही लेखन आहे. कथा-कादंबऱ्यांमधून खेडं, त्याची अवकळा व पाण्याशिवायचा नापीकपणा र. वा. दिघे यांच्या सराई, आई आहे. शेतात पाणकळा या कादंबऱ्यांमधून फार ताकदीनं पहिल्यांदा आलं.

शंकर पाटलांच्या टारफुलापेक्षाही कित्येक वर्षांत बरा हंगाम आला, पीक खळ्यात आलं, घरात यायच्या आधी अशी वावटळ-कभिन्न पाऊस आला, त्यानं सगळं काही मातीमोल झालं, असा नेस्तनाबूत करणारा, नागवणारा पाऊस, खेड्यातल्या दीर्घकालीन सुखदुःखांच्या जीवनात गीत, कहाणी, गोष्ट किती तरी अस्सल असं हे साहित्य थेट पाण्याशी शेतीबाडीशी बांधलेलं आहे. लहानपणापासून "ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा, ये गं ये गं सरी, माझे मडके भरी, सर आली धावून, मडके गेले वाहून।" या सार्वत्रिक ओठांवर असलेल्या गीतांमधूनच आम्ही वाढलो. मोठे झालो. दोन नक्षत्रांतही पाणी नाही म्हणून नाचगाणं करून भीमदेवाला प्रार्थना केली. "धोंडी धोंडी

पानी दे, साय माय पिकू दे । दगडाचा देव पाणी मोठा येव ।'' आदिवासी जीवनात महाराष्ट्रात, गुजरात, राजस्थान, पंजाबात अलिखित जिवंत असं साहित्य आहे. एका बाजूला दुष्काळाची करुणार्त गीतं साहित्यात आहेत, तशी आनंदघन अशीही आहेत. बिहारमधल्या महापुराचं थैमान, उद्ध्वस्त झालेलं जीवन, त्यातल्या यातना 'ऋणजल धनजल'सारख्या साहित्यकृतीतून फणीश्वरनाथ रेणूसारख्यांच्या लेखनातून वाचताना आपण अस्वस्थ होतो. अगदी आजच्या काळातला लक्ष्मीकांत देशमुख यांचा केवळ पाण्याच्या संबंधीचा कथासंग्रह. 'तहान' ही सदानंद देशमुख यांची कादंबरी, 'दुकाळदेशी' हे अमर हबीब या पत्रकाराचं लेखन मराठीतूनही भेटू लागलं, असं मला वाटतं. दत्ता देशमुखांचं 'दुष्काळ व पाणी', आप्पासाहेब पवारांचं 'पाणी', अण्णासाहेब शिंदे यांचं 'शेती व पाणी', यशवंतराव प्रतिष्ठाननं संपादित केलेलं 'दुष्काळ व पाणी' असं नव्या मांडणीतून आलेलं ललित वैचारिक लेखन हे 'पाणी' या शब्दाला, त्याच्या वलयाला केंद्र करून लिहिलेलं आहे. कवी यशवंत मनोहर यांना त्यांचा पिळवटणारा अनुभव मांडताना 'पाऊस' प्रतिमाच महत्त्वाची वाटते. म्हणून कालचा 'पाऊस' आमच्या गावात झालाच नाही, असं ते लिहितात. त्याचवेळी 'हा श्रावण गळतो दूर, नदीला पूर, तरूवर पक्षी घन ओले त्यातून चंद्रदिव्यांची नक्षी' असं ग्रेस लिहून जातात,

"ये रे घना ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना ।'' असं आरती प्रभूंना लिहावं वाटतं. 'जलधारात तारा छेडीत आला श्रावण छंदीफंदी, त्याची चढते गीत धुंदी' असं लिहिणारे ना. घ. देशपांडे, कृ. ब. निकुंब यांसारख्या कवींच्या अनेक पावसाच्या ओळी आठवतात व इंदिरा संतांपासून शहर, खेडी सगळ्यांना पाऊस लपेटून राहतो. माझा तर कवितासंग्रहच 'पावसाळी' कवितांचा आहे व पन्नास-साठ तरी कविता पाऊसपाण्याला बिलगून आहेत.

*ठीक आसानीमे तुम कमीज बदलते हो, ठीक उसी तरह शहर भी*
*कहो पानी के लिये तडप तडपकर मरनेवालोंको, क्या बदलना चाहिये ?*

नामदेव ढसाळ यांच्या कवितेचं हे भाषांतर आहे. दलितांच्या दुःखाची व्याकुळता सांगणारं ! तुळशी परब यांची एक मोठी कविता यासारखीच पण वेगळी आहे. चंद्रकांत पाटील यांच्या 'पाण्यावरल्या नोंदी' अशाच खूप काही नवं देऊन जाणाऱ्या जाणिवांच्या, नव्या अनोखी अनुभवांच्या. भुजंग मेश्राम यांच्या 'उलगुलान'या कवितासंग्रहात पाण्याच्या संबंधात खूप कविता आहेत. 'नर्मदेशी बातचीत' अशी एक चांगली कविता आहे. पाऊस मराठी साहित्यातून, भारतीय साहित्यातून अनेक ठिकाणी आहेच. परंतु बदलत्या अनेक पदरी अनुभवांनी, प्रश्नांनी शहर, खेडी, शास्त्रज्ञ, चिंतक या सगळ्यांचा होऊन लेखनातून नवी नवती घेऊन येतो आहे.

पाण्याचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या नुसत्या पाण्याचा प्रश्न नसून महाराष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या सौभाग्याचा प्रश्न आहे. पाण्यासंबंधी, पाण्याच्या प्रश्नासंबंधी कितीही लिहिलं बोललं तरी अपूर्ण वाटावं इतकं ते जगड्व्याळ विस्तारलेलं आहे.

(ना. धों. महानोर यांनी अ. भा. जलसाहित्य संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणाचा काही भाग)



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक नववा

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १० रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **खास नोंद** | ५ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **श्रद्धांजली** | २१ |
| **पुस्तक परिचय** | |
| व्हॉट वेंट रॉंग : किरण बेदी अनु. लीना सोहोनी | २३ |
| देवदास : अनु. मृणालिनी गडकरी | २७ |
| टू कट अ लॉंग स्टोरी शॉर्ट : अनु. लीना सोहोनी | ३२ |
| हरवलेल्या वाटा : माधवी देसाई | ३७ |
| **नवी स्पर्धा** | ४० |
| **पुरस्कार** | ४१ |
| **फुले आणि काटे** | ४७ |

मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंट्स, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**

**वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*